लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

Download Our Apps | GET IT ON Google play

जळगाव, बुधवार, दि.५ ऑगस्ट २०२६ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | • अंक -२५८ • पाने ६ • किंमत ३ रु.


**संपादकीय...**

**चौधरी-महाजन ऑडिओ क्लिप...**

नंदुरबार येथील भाजपचे प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी आणि भाजपचे संकटमोचक म्हणून ओळखले जाणारे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्यातील टेलिफोनवरील ऑडिओ क्लिप व्हायरल झाली असून ती सध्या फार गाजत आहे. नंदुरबारचे विजय चौधरी यांनी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्याविषयी त्यांच्या मनात जे होते.

## सोने-चांदी

- **सोने** (प्रति १० ग्रॅम) : १,४१,९००
- **चांदी** (प्रति १ किलो): २,२२,३००

## तापमान

- **कमाल** : ३३ अंश सेल्सिअस
- **किमान** : २४ अंश सेल्सिअस

## अग्निहोत्र समय

| दि.५ | दि.६ |
| --- | --- |
| **सूर्योदय** : ६.०७ वा. | **सूर्योदय** : ६.०७ वा. |
| **सूर्यास्त** : ७.०१ वा. | **सूर्यास्त** : ७.०० वा. |

## महत्वाचे »»

### रानडुकराच्या हल्ल्यात एकजण गंभीर जखमी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**

**भंडारा –** जिल्ह्यात एका चहाच्या टपरी व नाश्त्याच्या उपहारगृहात रानडुकराने घुसून धुमाकूळ घातल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. सकाळच्या वेळेत ग्राहक नाश्ता आणि चहा घेत बसले असताना अचानक एक रानटी डुक्कर सैरावैरा पळत दुकानात शिरले. या अनपेक्षित प्रकारामुळे दुकानात एकच गोंधळ उडाला आणि ग्राहकांनी जीव वाचवण्यासाठी धावाधाव केली. याच दरम्यान रानडुकराने थेट शालिक भुरे (वय ६०) यांच्यावर हल्ला चढवला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. उपस्थित नागरिकांनी आरडाओरड करत रानडुकराला हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे रानडुक्कर तेथून पळून गेले. घटनेनंतर जखमी शालिक भुरे यांना तातडीने भंडारा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### शिक्षिकेची शाळेबाहेर चाकूने निर्घुण हत्या

**लोकशाही न्यूज नेटवर्क**

**फरिदाबाद –** हरियाणाच्या फरिदाबादमध्ये शिक्षिकेची निर्घृण हत्या करण्यात आली. शाळेबाहेर या शिक्षिकेवर चाकूने सपासप वार करण्यात आले. ही थरारक घटना शाळेबाहेरील सीसीटीव्हीत कैद झाली. या घटनेचा हा व्हिडीओ व्हायरल होत आहे. धक्कादायक बाब म्हणजे पोलिस ठाण्याजवळच ही घटना घडली. या घटनेमुळे हरियाणात खळबळ उडाली आहे.

# ‘गुंगी गुडीया’ने राज्याचे राजकारण तापले!

## सुनेत्रा पवारांवर काँग्रेसकडून विखारी टीका : मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचा संताप : काँग्रेसवर टीकेची झोड

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** ✍ प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा वादाचा मोठा भडका उडाला आहे. बीडमधील एका पत्रकार परिषदेचा संदर्भ देत महाराष्ट्र काँग्रेसने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत केलेल्या पोस्टमुळे नवा वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसने सुनेत्रा पवार यांचा उल्लेख ‘गुंगी गुडीया’ असा केल्याने सत्ताधारी महायुतीने यावर अत्यंत तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला आहे. काँग्रेसच्या अधिकृत सोशल मीडिया (एक्स / ट्विटर) अकाउंटवरून सुनेत्रा पवार यांच्यावर टीका करताना “सुनेत्रा पवार, अजून किती दिवस ‘गुंगी गुडीया’ बनून राहतील?” असा सवाल करण्यात आला आहे.

बीडमधील एका पत्रकार परिषदेतील व्हिडिओ पोस्ट करत काँग्रेसने ही टीका केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अमोल मिटकरी यांनी फोनवरून प्रतिक्रिया देताना काँग्रेसच्या या टीकेचा तीव्र निषेध केला आहे. त्यांनी काँग्रेसने याबद्दल तात्काळ माफी मागावी आणि ते पोस्ट मागे घ्यावे अशी मागणी केली आहे. अमोल मिटकरी यांनी स्पष्ट केले की, बीडमधील पत्रकार परिषदेत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांवर उत्तर देऊन झाल्यानंतर वारंवार तेच प्रश्न विचारले जात असल्यामुळे त्यांनी बोलणे थांबवले होते; मात्र काँग्रेसने त्या व्हिडिओचा विपर्यास करून टीका केली आहे. महाराष्ट्र काँग्रेसकडून सोशल मीडियावर बीडमधील एका पत्रकार परिषदेचा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते धनंजय मुंडे हे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना बोलण्यापासून थांबवताना दिसत असल्याचा दावा केला गेला आहे. हा व्हिडीओ पोस्ट करत काँग्रेसने सुनेत्रा पवार यांच्यावर निशाणा साधला आणि त्यांचा थेट ‘गुंगी गुडीया’ असा उल्लेख केला. काँग्रेसच्या या पोस्टमुळे महाराष्ट्रातील राजकरण तापले आहे. काँग्रेसच्या या वादग्रस्त पोस्टनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार अमोल मिटकरी यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. साम टीव्हीशी बोलताना मिटकरी यांनी काँग्रेसने केलेल्या या वक्तव्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. “काँग्रेसने महिला उपमुख्यमंत्र्यांचा असा अपमान करणे अत्यंत चुकीचे आहे. या वक्तव्याबद्दल काँग्रेसने तात्काळ माफी मागितली पाहिजे,” अशी जोरदार मागणी अमोल मिटकरी यांनी केली आहे. सुनेत्रा पवार यांचा गुंगी गुडिया असा उल्लेख केल्यामुळे चांगलंच राजकारण तापलं आहे. राज्याच्या पहिल्या मुख्यमंत्र्यांवर अशा प्रकारची टिप्पणी करणे हा अश्लाघ्यपणा आहे, असा हल्लाबोल सत्ताधाऱ्यांनी केलाय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर काँग्रेसने सुनेत्रा पवार यांची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी केलीय. दुसरीकडे काँग्रेस पक्ष मात्र आपल्या त्या विधानावर ठाम आहे. काहीही झालं तरी आम्ही माघार घेणार नाही. आम्ही आमच्या विधानावर ठाम आहोत, असे काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार म्हणाले आहेत. तर दुसरीकडे सुनेत्रा पवार यांनीही आम्ही कोणतीही अश्लाघ्या टीका केलेली नाही, असं म्हणत आपली माघार घेण्यास नकार दिला आहे.





### वेळ येऊद्या मग मी बोलते : सुनेत्रा पवार

दरम्यान, काँग्रेसच्या या गुंगी गुडिया या विधानानंतर सर्वत राजकीय वातावरण तापलेले असताना शेवटी सुनेत्रा पवार यांनी या संपूर्ण प्रकरणावर भाष्य केलंय. त्यांनी अवघ्या एका वाक्यात विषय संपवला आहे. वेळ येऊद्या मग मी बोलते, असं सुनेत्रा पवार म्हणाल्या आहेत. त्यामुळेच आता सुनेत्रा पवार भविष्यात नेमकं काय बोलणार? याकडे सर्वांचंच लक्ष लागलं आहे.

### ..तर आम्ही शांत बसणार नाही : भुजबळ

मंत्री छगन भुजबळ यांनी काँग्रेसवर संताप व्यक्त करत थेट इशाराच देऊन टाकला आहे. नुसतं बोलत राहिलो म्हणजे फार काम केलं असं होत नाही. एखाद्या व्यक्तीला थोडासा वेळ द्यायलाच लागतो. तो वेळ तुम्ही देणार की नाही? असाच प्रसंग माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासोबत घडला होता. तेव्हा आम्हाला त्याचं वाईट वाटलं होतं. हर्षवर्धन सपकाळ यांना ते वाईट वाटलं होतं की नाही ते आम्हाला माहिती नाही, अशी बोचरी टीका भुजबळ यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर केली. तसेच राहुल गांधी यांच्यापासून इतर नेते महिलांबाबत चांगले बोलत असतात. आता पहिल्यांदाच एक महिला महाराष्ट्रासारख्या राज्यात उमुख्यमंत्रिपदावर आहे. अशा महिलेबाबत असं बोलणं हे अतिशय अश्लाघ्य असं आहे. आम्हाला काँग्रेसकडून अशी अपेक्षा नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. आमच्या पक्षाचे लोक काँग्रेसच्या कार्यालयात गेले. आमच्या कार्यकर्त्यांनी त्यांना जाब विचारला. यापुढे मात्र एक लक्षात ठेवावं. तुम्ही जर आमच्या नेत्यांबाबत असं काही बोलत असाल तर भविष्यात आमचे लोक गप्प बसरणार नाहीत. आमचे लोक ऐकून घेतील असं नाही. आम्ही जाब विचारणार, असा थेट इशाराच भुजबळ यांनी दिला.

### काँग्रेसची बुद्धी भ्रष्ट झाली का? : उपमुख्यमंत्री

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काँग्रेसवर संताप व्यक्त केला. जनतेने काँग्रेसला त्यांची जागा दाखवली. काँग्रेसला लोकांनी घरी बसवलं, अशी टीका करत काँग्रेसने हे समजून घ्यावं आणि काँग्रेसने जे विधान केलं आहे, त्याबद्दल माफी मागावी, अशी मागणी शिंदे यांनी केली. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काँग्रेसने सुनेत्रा पवार यांचा गुंगी गुडिया असा केलेला उल्लेख योग असल्याचे सांगितले आहे. तसेच आपल्याकडे अर्थखातं घेऊन आपण गुंगी गुडिया नसल्याचे सुनेत्रा पवार यांनी सिद्ध करावं, असं आव्हानही त्यांनी दिलंय. यावर बोलताना, अर्थखातं आणि राजकीय विषय हे एका बाजूला ठिक आहे. मुख्यमंत्री आहेत, मी आहे. त्या विषयावर निर्णय घ्यायला आम्ही समर्थ आहोत, असं प्रत्युत्तर शिंदे यांनी हर्षवर्धन सपकाळ यांना दिले. तसेच अर्थखात्याच्या नावाखाली एका भगिनीचा अपमान करणं हे किती दुर्दैवी आहे. काँग्रेसची बुद्धी भ्रष्ट झाली आहे का, असा खरमरीत सवालही शिंदे यांनी हवर्षवर्धन सपकाळ यांना केला. अशाच लोकांमुळे काँग्रेसची ही स्थिती आहे. लोकांनी २०२४ साली काँग्रेसला त्यांची जागा दाखवली. आज त्यांची देशात, राज्यात काय स्थिती आहे. त्यांचे नेते परदेशात जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी, देशाचा अपमान करतात. देशाची बदनामी करतात. आज याच काँग्रेसच्या लोकांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा अपमान केला आहे, त्याबाबत त्यांनी माफी मागावी, अशी मागणीही शिंदे यांनी केली.

### काँग्रेस अतिशय खालच्या स्तरावर उतरले : मुख्यमंत्री

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही संतप्त प्रतिक्रिया देत काँग्रेसवर हल्ला चढवलाय. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी काँग्रेसवर जहरी टीका केली आहे. काँग्रेस अतिशय खालच्या स्तरावर हे उतरलेले आहेत. मुळामध्ये यांना कुठलाही रिस्पॉन्स मिळत नाही कोणी विचारत नाही त्यामुळे न्यूज मध्ये येण्यासाठी अशा पद्धतीचं काम चाललेल आहे. ’बदनाम हुए तो क्या हुवे नाम तो हुवा अशा पद्धतीने यांची कारवाई चाललेली आहे आणि मला असं वाटतं की महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीत इतक्या खालच्या स्तराला जाणारे हे आता आपल्याला पहिल्यांदाच पाहायला मिळत असल्याचं फडणवीस म्हणाले.

### हे फक्त वर्णन हा चुकीचा शब्द नाही!

दरम्यानं सपकाळ यांनी स्पष्टीकरण दिले. गुंगी गुडिया हे वर्णन आहे, हा काही चुकीचा शब्द नाही. कारण, सुनेत्रा पवार बोलत नाहीत, अजित पवार यांच्या अपघातावर त्या काही बोलत नाहीत, गुन्हा नोंदविला जावा त्यावर काही बोलत नाही, अर्थ खाते कधी मिळणार यावर काही बोलत नाही. भाजपचा दबाव आहे, म्हणून त्या बोलत नाही. मात्र, संवैधानिक पदावर असलेल्याच्या वर्तनाला हे अशोभनीय आहे, असे म्हणत हर्षवर्धन सपकाळ यांनी ’गुंगी गुडिया’ या टीकेचं समर्थन केलं आहे. आमच्या या टीकेला त्यांनी समजून घ्यावे, आम्हाला शहाणपणा शिकवू नका, असेही त्यांनी स्पष्ट केले. समाजकारणात, राजकारणात आपल्यावर जर आरोप होत असतील त्यावर नेत्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांची उत्तर दिली पाहिजे. मात्र, ज्यांच्यावर गुंड म्हणून आरोप असणारा, ओळख असणारा एक व्यक्ती पत्रकारांना एकेरी भाषेमध्ये चूप बस बोलत आहे. मात्र, तिथं उपमुख्यमंत्री काही बोलत नाही, त्यांच्यासमोर पत्रकारांना चूप बसविले जाते, हे लोकशाही आणि सामाजिक जीवनाला न शोभणारं आहे. त्यामुळे, त्यांनी तिथं जी भूमिका निभावली त्याला अनुसरुन हा गुंगी गुडिया शब्द आहे, असे स्पष्टीकरण हर्षवर्धन सपकाळ यांनी काँग्रेसच्या ट्विटबद्दल दिले.

### हीच काँग्रेसची संस्कृती का? : चाकणकर

रुपाली चाकणकर यांनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवर एक लांबलचक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टच्या माध्यमातून त्यांनी मोठी मागणी केली आहे. “विचारांचा पराभव झाला की काँग्रेस महिलांचा अपमान करते,हीच त्यांची खरी ओळख.” आदरणीय दादांच्या पश्चात त्यांच्या पत्नी आणि महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री असलेल्या सुनेत्रा वहिनींची खिल्ली उडवणं यातुन, काँग्रेसच्या विकृत मानसिकतेचे दर्शन होत आहे” असे रुपाली चाकणकर म्हणाल्या. शेवटी रुपाली चाकणकर म्हणाल्या की, एखाद्या महिलेच्या कर्तृत्वाला उत्तर देता येत नसेल, तर तिच्यावर वैयक्तिक टीका करून तिचा अवमान करणे ही काँग्रेसची राजकीय संस्कृती आहे का? महिलांच्या सन्मानाच्या नावाने राजकारण करणाऱ्यांनी आज स्वतःच आपला खरा चेहरा महाराष्ट्रासमोर उघड केला आहे.

# रेल्वेत झालेल्या बलात्काराला रेल्वेच जबाबदार!

## हायकोर्टाचा मोठा निर्णय : पीडितेला नुकसान भरपाईचे आदेश

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** ✍ वृत्तसंस्था

२०१२ मध्ये ट्रेनमध्ये महिलेवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणावर दिल्ली हायकोर्टाने ऐतिहासिक निर्णय दिला आहे. कोर्टाने या प्रकरणी रेल्वेला जबाबदार धरत ३ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले. या सुनावणीदरम्यान हायकोर्टाने सांगितले की, ‘रेल्वे आपल्या जबाबदारीपासून पळू शकत नाही.’ पीडित महिलेला ३ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे निर्देश देणाऱ्या राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या आदेशांना केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने दिल्ली हायकोर्टात धाव घेत याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना दिल्ली हायकोर्टाने या प्रकरणात रेल्वेला जबाबदार धरलं. जरी हा गुन्हा बाहेरील व्यक्तीने केला असला तरी देखील कायदेशीररित्या प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करण्याची आपली जबाबदारी रेल्वे टाळू शकत नाही, असे हायकोर्टाने स्पष्ट केले. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या निर्णयानंतर रेल्वे प्रशासनाने थेट दिल्ली हायकोर्टात धाव घेतली होती. या सुनावणीदरम्यान रेल्वेने कोर्टात युक्तीवाद केला की, ही घटना रेल्वे कायद्याच्या कलम १२३ अंतर्गत ‘अवांछित घटना’ या श्रेणीत येत नाही आणि त्यामुळे कलम १२४अ अंतर्गत नुकसान भरपाई दिली जाऊ शकत नाही. पण हायकोर्टाने रेल्वेचा हा युक्तिवाद फेटाळून लावत सांगितले की, ‘सामूहिक बलात्काराची घटना ‘अवांछित घटना’ या व्याख्येत नक्कीच येईल कारण तो एक हिंसक हल्ला आहे.’ न्यायमूर्ती अमित बन्सल यांनी सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की,’कायद्याच्या कक्षेत केवळ रेल्वेगाड्यांमध्येच नाही तर रेल्वे प्लॅटफॉर्मवर आणि परिसरात होणारे हिंसक हल्ले देखील

पान २ वर »

# एअर इंडियाच्या विमानाला हवेत जोरदार धक्के!

## टर्ब्युलन्सचा तडाखा : लँडिंग सुरक्षित मात्र १६ जण जखमी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** ✍ वृत्तसंस्था





थायलंडमधील फुकेतहून दिल्लीला येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाबाबत एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. या विमानाला हवेच्या तीव्र झटक्यांचा (टर्ब्युलन्स) सामना करावा लागला, ज्यामुळे विमानाच्या उंचीत क्षणभराचा बदल झाला. विमानाने दिल्लीत सुरक्षित लँडिंग केले. सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षितपणे खाली उतरले. ही घटना मंगळवारी घडली. काही प्रवासी आणि कर्मचारी किरकोळ जखमी झाले. खबरदारीचा उपाय म्हणून, त्यांना तपासणी आणि उपचारासाठी विमानतळावरील वैद्यकीय केंद्रात नेण्यात आले. विमानाचा फ्लाईट क्रमांक एआय२३७९ आहे. एअर इंडियाने म्हटले आहे की, “प्रवासी आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा हे त्यांचे सर्वोच्च प्राधान्य आहे. बाधित झालेल्यांना सर्वतोपरी मदत पुरवली जात आहे आणि घटनेच्या तपासात संबंधित अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य केले जात आहे. ४ ऑगस्ट

पान २ वर »

# राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ८ मोठे निर्णय!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** ✍ प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ७ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहे. राज्यभरातील जनता, शेतकरी आणि प्रशासकीय व्यवस्थेसाठी अनेक महत्त्वाचे सात निर्णय घेण्यात आले आहेत. या निर्णयांमध्ये ‘गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजने’ला पुढील ३ वर्षांसाठी मुदतवाढ देण्यात आली असून, आता यामध्ये भूमिहीन शेतमजूर आणि महिला शेतकऱ्यांचाही नव्याने समावेश करण्यात आला आहे. याशिवाय न्याय व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नाशिक, नांदेड, बीड, छत्रपती संभाजीनगर आणि पिंपरी-चिंचवड येथे नवी न्यायालये व पदनिर्मिती, तसेच राज्य माहिती आयोगात ३ नवीन माहिती आयुक्तांच्या पदांना मंजुरी देण्यात आली आहे. मुंबईतील सर्व शासकीय आणि पालिकेची वीज बिले आता ‘बेस्ट’च्या केंद्रीकृत प्रणालीद्वारे भरली जाणार आहेत.



गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेस आणखी तीन वर्षाची मुदतवाढ. आता योजनेत भूमिहीन शेतमजूर व महिला शेतकऱ्यांचा समावेश होणार. महिला शेतकरी सक्षमीकरण कायद्यामुळे दिलासा. (कृषी व पदुम विभाग). मुंबई शहरातील सर्व शासकीय कार्यालयांची व मुंबई महानगरपालिकांची वीज देयके बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमच्या (बेस्ट उपक्रम) संयुक्त बिलिंग प्रणालीद्वारे केंद्रीकृत पद्धतीने अदा केली जाणार. त्यासाठी प्रशासकीय सुधारणेस मान्यता. (ऊर्जा विभाग). महाराष्ट्र राज्य माहिती आयोगात राज्य माहिती आयुक्त यांची आणखी तीन नवीन पदे. या पदांसाठी आवश्यक अधिकारी व कर्मचारी यांची पदे निर्माण करण्यास मान्यता. (सामान्य प्रशासन विभाग). सिल्लोड (जि. छत्रपती संभाजीनगर) येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, तसेच सरकारी वकील कार्यालय होणार., त्यानुषंगाने न्यायिक अधिकारी व कर्मचारीवृंद यांची पदे मंजूर व त्यासाठीच्या आर्थिक तरतुदीस मान्यता. (विधि व न्याय विभाग). चांदवड (जि.नाशिक) येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय होणार. त्यासाठी आवश्यक पदनिर्मितीस, खर्चाच्या तरतुदीस मान्यता. (विधि व न्याय विभाग). किनवट (जि. नांदेड) येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, सरकारी वकील कार्यालय व वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय होणार. या न्यायालयांसाठी आवश्यक न्यायिक अधिकारी व कर्मचारी यांची पदे त्यासाठीच्या खर्चाच्या तरतुदीस मान्यता. (विधि व न्याय विभाग). केज (जि. बीड) येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय होणार. या न्यायालयासाठी आवश्यक न्यायिक अधिकारी व कर्मचारी यांची पदे व त्यासाठी आवश्यक खर्चाच्या तरतुदीस मान्यता. (विधि व न्याय विभाग). पिंपरी-चिंचवड (जि. पुणे) येथे विशेष मोटार वाहन न्यायालय होणार. (विधि व न्याय विभाग).




# आमडदे शाळेत ऑनलाइन अभ्यासिकेचे उद्घाटन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भातखंडे** प्रतिनिधी



कर्मवीर तात्यासाहेब हरि रावजी पाटील किसान शिक्षण संस्था, भडगाव संचलित सौ. साधनाताई प्रतापराव पाटील माध्यमिक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, आमडदे येथे विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी ऑनलाइन अभ्यासिकेचे उद्घाटन करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य एन. जी. पाटील यांच्या हस्ते फीत कापून ऑनलाइन अभ्यासिकेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक वाय. एम. देसले, संजू सूर्यवंशी यांच्यासह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. उपक्रमशील शिक्षक दीपक पाटील आणि रुपेश भदाणे यांनी ऑनलाइन अभ्यासिकेची प्रभावी व आकर्षक मांडणी केली. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक असलेले डिजिटल साहित्य, ऑनलाइन अध्ययन सुविधा आणि डिजिटल क्लासरूमचा प्रभावी वापर याबाबत माहिती देण्यात आली. प्राचार्य एन. जी. पाटील, पर्यवेक्षक वाय. एम. देसले तसेच संजू सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना डिजिटल क्लासरूम आणि ऑनलाइन अभ्यासिकेचे महत्त्व समजावून सांगत स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी अशा सुविधा अत्यंत उपयुक्त असल्याचे नमूद केले. सूत्रसंचालन संदीप सोमवंशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# खा.वाघ यांची पूरग्रस्त भागांना भेट

## नुकसानीची पाहणी, तातडीच्या मदतीचे आश्वासन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** प्रतिनिधी



जळगाव लोकसभा मतदारसंघाच्या खासदार स्मिता वाघ यांनी पारोळा तालुक्यातील पूरग्रस्त भागांचा पाहणी दौरा करून नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी देवगाव येथे भेट देत अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. अतिवृष्टीमुळे दुधाई नदीला आलेल्या पुरामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून काहींची उभी पिके मातीसह वाहून गेल्याची माहिती ग्रामस्थांनी खासदार वाघ यांना दिली. तसेच अनेक शेतांतील सुपीक माती वाहून गेल्याने ती जमीन सध्या पेरणीसाठीही अयोग्य ठरल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. पुरामुळे अनेक शेतकऱ्यांची दुधाळ जनावरे वाहून गेली, तर काही जनावरे मृत झाल्याचेही यावेळी निदर्शनास आणून देण्यात आले. याशिवाय अनेक नागरिकांनी कष्टाने उभारलेली दुकाने, संसारोपयोगी साहित्य, साठवलेली रोकड, शेळ्या तसेच उपजीविकेची साधने काही तासांत पुराच्या पाण्यात वाहून गेल्याची व्यथा ग्रामस्थांनी मांडली. ढगफुटीसदृश पावसामुळे दुधाई नदीला आलेल्या पुरात नदीकाठावरील काही घरेही वाहून गेल्याची माहिती खासदार वाघ यांना देण्यात आली. त्यानंतर त्यांनी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून महसूल व कृषी विभागाने कोणताही विलंब न करता तातडीने पंचनामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी खासदार वाघ यांनी खासदार निधीतून नदीकाठावर संरक्षणभिंत उभारण्यासाठी मंजुरी देण्यात आल्याची माहिती देत, केंद्र व राज्य शासनाकडून पूरग्रस्तांना जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिले. या पाहणी दौऱ्यावेळी देवगावचे सरपंच समीर पाटील, महसूल विभागाचे अधिकारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## वकिलावर लोखंडी रॉड, दगडाने हल्ला

**लोकशाही न्यूज नेटवर्क**

**बीड –** बीडमध्ये वकिलावर जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. आमच्या विरोधातल्या लोकांची लय वकिली करतोस असे म्हणत या वकिलावर हल्ला करण्यात आला. लोखंडी रॉड आणि दगडाने वकिलावर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात वकील गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी हॉटेल मालकासह कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील केज शहरातील कळंब रोडवरील एका हॉटेलमध्ये ही घटना घडली. वकील मंगेश भोसले यांच्यावर लोखंडी रॉड आणि दगडाने जीवघेणा हल्ला करण्यात आला. दिवाणी वादात विरोधी लोकांची बाजु घेतल्याने त्यांच्यावर हल्ला झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे बीडमध्ये खळबळ उडाली आहे. हॉटेल मालक सत्यम लोहीया, विष्णुदास लोहीया आणि त्यांच्या हॉटेलच्या कर्मचाऱ्यांनी वकिलाला जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

## किनगावात आदिवासी गौरव दिन आयोजन बैठक

**लोकशाही न्यूज नेटवर्क**

**किनगाव –** यावल तालुक्यातील किनगाव येथे दि. ९ ऑगस्ट २६ रविवार रोजी जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने आदीवासी पंच मंडळातर्फे आदिवासी गौरव दिवसाचे आयोजन करण्यासंदर्भात नुकतेच बैठकीचे आयोजन करण्यात आले. सदरील बैठकीत परिसरातील आदिवासी बांधवांनी हिरीरीने सहभाग नोंदवून आदिवासी दिवस उत्साहात साजरा करण्याचे ठरविण्यात आले. दरम्यान आदिवासी पंच मंडळ हे भिल-तडवी व भिल्ल-बारेला या आदीवासी समाजामार्फत चालवले जात असून गेल्या पाच ते सहा वर्षापासुन किनगाव येथे ९ ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. सदर बैठकीत आदिवासी गौरव दिनानिमित्ताने दि. ९ ऑगस्ट रविवार रोजी परिसरातील आदिवासी बांधवांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन आदिवासी पंच मंडळाच्या वतीने करण्यात आले. यावेळी पंच अध्यक्ष अशोक भिल्ल, अजहर तडवी, शरीफ शिराज, खलील शिराज, विकास बरेला, रूधु भिल, गणेश भील, रफीक तडवी, समीर तडवी, सबदर तडवी, दीपक बारेला, विकास बारेला, आनंद भील, लतीब तडवी, अनीस तडवी, बबलू तडवी, अनिल बारेला, भरत बरेला, दीपक बरेला, प्रकाश बरेला, राकेश बरेला, धनराज भील, चूडामन भील, उसेन तडवी यांच्यासह समाजबांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

# कुंडाणे येथे वृक्षारोपण उपक्रम उत्साहात



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**शिंदाड ता. पाचोरा** प्रतिनिधी

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुंडाणे (वार) येथे वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी तसेच उपस्थित मान्यवरांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका शोभा पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच रेखा पाटील, संगीता पवार, मनीषा कटरे व अर्चना पवार या शिक्षकवृंदांनी उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले. हा वृक्षारोपण उपक्रम शासकीय कृषी महाविद्यालय, धुळे येथील कृषी कन्या प्रांजल पटारे, वैष्णवी परदेशी, सपना आढाव, सायली गोसावी, श्रावणी कदम आणि अक्षदा अंधारे यांनी राबविला. विद्यार्थिनींनी वृक्षारोपणाचे महत्त्व, पर्यावरण संरक्षणाची गरज आणि वृक्षसंवर्धनाबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. हा उपक्रम महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम. इल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली, कार्यक्रम अधिकारी डॉ. कुलकर्णी मॅडम तसेच कार्यक्रम समन्वयक डॉ. जे. एच. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. सर्वांनी लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याची शपथ घेत पर्यावरण संरक्षणासाठी सातत्याने कार्य करण्याचा संकल्प केला.

## निधन वार्ता

### कडूजी इंगळे



**मुक्ताईनगर –** निमखेडी बु येथील दुध उत्पादक सहकारी संस्था निमखेडी बु.चे व्हाईस चेअरमन बाळू इंगळे यांचे वडील कडूजी नाथुजी इंगळे यांचे दि. ४ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दिनांक ५ रोजी त्यांच्या राहते घर निमखेडी बुद्रुक येथून ९ वाजता निघणार आहे.

पान १ वरून

## एअर इंडियाच्या विम...

रोजी, फुकेतहून दिल्लीला येणाऱ्या एआय२३७९ या फ्लाईटला प्रवासादरम्यान हवेच्या तीव्र झटक्यांचा (टर्ब्युलन्स) सामना करावा लागला, ज्यामुळे विमानाच्या उंचीत अचानक बदल झाला. विमानाने दिल्लीत सुरक्षित लँडिंग केले आणि सर्व प्रवासी व कर्मचारी सुरक्षितपणे बाहेर पडले आहेत.'' एअरलाइनने पुढे सांगितले, ''किरकोळ जखमी झालेल्या काही प्रवाशांना आणि क्रू सदस्यांना खबरदारीचा उपाय म्हणून विमानतळावरील वैद्यकीय सुविधेकडे नेण्यात आले आहे. प्रवासी आणि क्रू सदस्यांची सुरक्षा आणि कल्याण हे एअर इंडियाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. आम्ही बाधित झालेल्यांना सर्व आवश्यक मदत पुरवत आहोत आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या तपासात पूर्ण सहकार्य करत आहोत.'' अचानक बसलेल्या धक्क्यामुळे विमानातील अनेक प्रवाशांचा तोल गेला. या घटनेत बारा प्रवासी आणि चार केबिन क्रू सदस्य जखमी झाले. एअरलाइनच्या म्हणण्यानुसार, बहुतेकांना किरकोळ दुखापत झाली आहे. दिल्लीत आगमन झाल्यावर, एका वैद्यकीय पथकाने जखमींची तपासणी करून आवश्यक उपचार केले. घटनेची माहिती मिळताच दिल्ली विमानतळ अधिकाऱ्यांना तात्काळ सतर्क करण्यात आले. गरज भासल्यास त्वरित मदत पुरवण्यासाठी विमान उतरण्यापूर्वीच वैद्यकीय आणि आपत्कालीन प्रतिसाद पथकांना सज्ज ठेवण्यात आले होते. विमान सुरक्षितपणे उतरल्यानंतर, जखमी प्रवासी आणि कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली.

## रेल्वेत झालेल्या ...

येतात. पीडित व्यक्ती वैध तिकीट घेऊन प्रवास करणारी एक कायदेशीर प्रवासी होती, असे कोर्टाने सांगितले. यावेळी हायकोर्टाने राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अधिकारक्षेत्राचे समर्थन केले आणि म्हटले की, आयोगाने गंभीर मानवाधिकार उल्लंघनाच्या पीडितांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची शिफारस करून आपल्या अधिकाराचा योग्य वापर केला आहे.' हायकोर्टाने पुढे राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचा निर्णय कायम ठेवत ३ लाख रुपये पीडितेला देण्याचे निर्देश रेल्वेला दिले.

# स्मार्ट मीटरच्या तक्रारीविरोधात महावितरणला निवेदन



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** प्रतिनिधी

येथील अखिल भारतीय ग्राहक पंचायती च्या वतीने स्मार्ट मीटर बसविल्यानंतर ग्राहकांना येणाऱ्या दुप्पट-तिप्पट वीज बिलाच्या तक्रारी वाढत असल्याने महावितरण वीज कंपनी लिमिटेड, अमळनेर उपविभाग - १ चे अतिरिक्त कार्यकारी अभियंता धनंजय धांडे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की सध्या महावितरणकडून स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रक्रियेबाबत नागरिकांमध्ये संभ्रम आणि भीतीचे वातावरण आहे. ज्या ग्राहकांचे जुने मीटर बदलून नवीन स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत, त्यांना नेहमीपेक्षा जास्त बिले येत आहेत. ग्राहक संरक्षण कायदा २०१९ आणि वीज कायदा २०२३ नुसार ग्राहकाला योग्य माहिती, संपूर्ण पारदर्शकता आणि निवडीचा अधिकार मिळणे आवश्यक आहे. परंतु या प्रक्रियेत पारदर्शकता दिसून येत नाही. याप्रसंगी अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी या विषयासंबंधी कार्यशाळा आयोजित करून ग्राहकांचे स्मार्ट मीटर बद्दलचे संभ्रम दूर करून पूर्णपणे निरसन करण्यात येईल अशी त्यांनी यावेळी ग्वाही दिली. या प्रसंगी विजय शुक्ला, मकसूद बोहरी, सुनील वाघ, सतीश देशमुख, नरेंद्र बाळू पाटील, भाऊसाहेब देशमुख, दिलीप सारजे, सुभाष पाटील घोडगावकर उपस्थित होते.


**जाहिर नोटिस**

ॲड.बी.आर.पाटील

भडगांव येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो., यांचे न्यायालयात

दिवाणी कि.अर्ज नं. ७१/२०२६
चौकशी ता. ०४/०९/२०२६

अर्जदार...१. गं.भा. वंदना संजय डहाळे उ.व. ५९ वर्षे, धंदा घरकाम, २ निलिमा अमर भूमकर, उ.व. २९ वर्षे, धंदा घरकाम, ३. अक्षदा स्वप्नील डहाळे, उ.व.-२६, धंदा-घरकाम, ४. स्वरांश स्वप्नील डहाळे, उ.व.-४ वर्षे, अर्जदार नं-४ ची अ.पा.क. अ.नं.-३ सर्व रा. गुढे, ता. भडगांव, जि. जळगांव...विरूध्द...कोणीही नाही...सामनेवाला

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट २ व ३ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज..

ज्याअर्थी, अर्जदार हे वरील नमूद पत्यावरील कायमचे रहिवासी असून अर्जदार नं १ चे पती, अर्जदार नं २ चे वडील तसेच अर्जदार नं ३ चे सासरे व अर्जदार नं ४ चे बाबा नामे सजू उर्फ सजय सुरेश डहाळे हे दि. १५/०८/२०१८ रोजी राहत्या घरी गुढे येथे मयत झालेले आहेत. तसेच मयताचा व अर्जदार नं १ चा मुलगा तसेच अर्जदार नं २ चा भाउ, अर्जदार नं ३ चे पती व अर्जदार नं ४ चे वडील नामे स्वप्नील संजय डहाळे हे देखील दि. ०५/०३/२०२५ रोजी मयत झालेले आहेत.

मयत संजू उर्फ संजय सुरेश डहाळे यांना अर्जदार यांच्या शिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत स्वप्नील संजय डहाळे यांचे मयताचे वारस कामी याच मे.य कोर्टात वारस दाखला मिळणेकामी दि की. अर्ज न ७४/२०२५ हा अर्ज दाखल केलेला होता व त्यावर मे. कोर्टाने निर्णय पारित केलेला असून दि. १४/१०/२०२५ रोजी वारस प्रमाणपत्र दिलेले आहे.

तरी वरील अर्जदार यानी वारस दाखला मिळणेकामी में भडगांव न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ३ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. तरी त्याबाबत कोणाचीही काहीएक हरकत असल्यास त्यानी या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत भडगांव कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात. अन्यथा कोणाचीही काहीएक हरकत नाही असे समजुन पुढील योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील.

आज तारीख ०४/०८/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व आमच्या सहीनिशी दिले.

कनिष्ठ लिपीक — हुकूमावरुन, सहा. अधिक्षक, फौजदारी न्यायालय, भडगांव जि. जळगांव

---

**जाहीर नोटीस**

ॲड.महेंद्र बी.पाटील

जामनेर येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर जामनेर यांचे कोर्टात जि. जळगाव

दि.कि.अर्ज नं.१३४/२०२६
निशाणी ७

**अर्जदार :- १]** दिलीप अमरसिंग माळी, उ.व. ५३ धंदा नोकरी रा. गट नं. २५९, प्लॉट नं. ३३ शांतीनारायण नगर, मेहरुण तलाव रस्ता, जळगाव ता. जि. जळगांव [२] अशोक अमरसिंग माळी, उ.व.५८ धंदा नोकरी, रा.सिंहगड कॉलनी, एन-६, सिडको कॉलनी ता.जि.छ.संभाजीनगर [३]शोभाबाई गणेश वैरभैय्य, उ.व.५० धंदा घरकाम, रा. वाघेरा. पो. मादणी ता.जि.छ.संभाजीनगर [४]शिलाबाई प्रकाश कोठोडे उ.व.४७ धंदा घरकाम, रा.शिवनागेट, रोहिदास नगर, अजिंठा, ता. सिल्लोड जि.छ.संभाजीनगर

//विरुध्द//
कोणीही नाही ..... सामनेवाला

**अर्ज:- भारतीय वारसा कायद्याचे कलम ३७२ प्रमाणे वारस दाखला मिळणबाबत**

१] अर्जदार हे वर नमुद पत्यावर कायमचे रहिवासी आहेत. अर्जदार क्र.१ ते ४ हे **मयत मंदाबाई अमरसिंग माळी** यांच्या मुले-मुली असून ते वर नमुद पत्यावर कायमस्वरुपी रहिवासी आहेत. **मयत मंदाबाई अमरसिंग माळी यांचा मृत्यू दि. १३/०२/२०२६ रोजी मौजे जळगांव ता.जि. जळगाव येथे झाला आहे. तसेच अर्जदार यांचे वडील अमरसिंग माळी हे सन २००४ मध्ये मयत झालेले आहेत.**[२] **मयत मंदाबाई अमरसिंग माळी** यांचे जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि.शाखा शेंदुर्णी ता. जामनेर जि. जळगांव येथे असलेल्या बॅक **खाते क्र.८१२०४५२०२०००००१८० मध्ये पेंशनची रक्कम र. ५७,५३३ अक्षर सत्तावन्न हजार पाचशे तेहतिस रुपये मात्र** जमा आहेत. सदर रक्कम मिळणेसाठी अर्जदार हे बॅकेत सदरची रक्कम मिळविणेकामी गेले असता संबंधीत बॅक अधिकारी यांनी त्यांना कायदेशीर वारस असलेबाबतचा मे. न्यायालयाचा वारस दाखल्याची मागणी केली असल्याने त्यांनी सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.[३] त्याअर्थी सदरील किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार क्र. १ ते ४ हेच **मयत मंदाबाई अमरसिंग माळी** यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त **मयत मंदाबाई अमरसिंग माळी** यांना आणखी कोणी कायदेशीर वारस असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वत: किंवा आपले वकीलांमार्फत **मे. कोर्टात दि. २८/०९/२०२६ रोजी प्रत्यक्ष** जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वत: हजर रहावे. जर अर्जदार यांचे व्यतीरिक्त कोणीही वारस नाही असे समजून आल्यास मे कोर्ट पुढील आदेश करतील या कामी आपण हजर न राहील्यास आपले काहीएक म्हणणे नाही असे समजण्यात येवुन आपला बचाव रद्द होणेस प्राप्त होईल.आज दिनांक **०३/०८/२०२६** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिले असे.

सही/- क. लिपीक — कोर्टाचा शिक्का — हुकूमावरुन सही/- सहा.अधिक्षक दिवाणी न्यायालय,क.स्तर जामनेर

---

**जाहीर नोटीस**

ॲड.निलेश ए.गोसावी

जामनेर येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर जामनेर यांचे कोर्टात जि. जळगाव

दि.कि.अर्ज नं.११८/२०२६
निशाणी ७

**अर्जदार :- १]** मयुर निवृत्ती दुसाने, उ.व.२९, धंदा मजुरी, रा.टाकळी ता.जामनेर जि. जळगांव [२] भाग्यश्री राहुल मोरे उ.व.३२ धंदा गृहिणी, रा.बेटावद ता.जामनेर जि.जळगाव [३]दिपाली वैभव निकुंभ, उ.व. ३६, धंदा गृहिणी महात्मा फुले चौक, नवनाथ नगर, राहता जि.अहमदनगर [४] उषा संदीप विसपुते, उ.व. ३८ धंदा गृहिणी, रा.टाकळी ता. जामनेर जि. जळगाव [५] अरुणा निवृत्ती दुसाने, उ.व. ५३ धंदा गृहिणी, रा. टाकळी ता.जामनेर जि. जळगाव

//विरुध्द//
कोणीही नाही ..... सामनेवाला

**अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ३प्रमाणे वारस दाखला मिळणेबाबत**

१] मयत **निवृत्ती वसंत दुसाने** हे कायमस्वरुपी रा. टाकळी ता. जामनेर जि. जळगाव येथील आहे. **मयत निवृत्ती वसंत दुसाने** यांना अर्जदार क्र.१ मुलगा व अर्जदार क्र.२,३,४ या मुली असून अर्जदार क्र.५ ही पत्नी आहे. **मयत निवृत्ती वसंत दुसाने यांचे दिनांक १५/०६/२०२१ रोजी मौजे टाकळी ता. जामनेर जि. जळगाव येथे निधन झाले आहे.** त्यांच्या पश्चात त्यांना वरील नमुद अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. अर्जदारांशिवाय इतर अन्य कोणीही कायदेशीर वारस नव्हते व नाही.[२] अर्जदार हे दिनांक १७/०६/२०२६ रोजी म.तलाठी टाकळी यांचेकडे वारस दाखल्याची मागणी केली असता त्यांना मे. कोर्टातून वारस दाखला आणण्याचे तोंडी सांगितले असल्याने अर्जदार यांनी वेगवेगळया शासकिय व निमशासकीय कामासाठी **मयत निवृत्ती वसंत दुसाने** यांचे ते कायदेशीर वारस असलेबाबत मे. न्यायालयातून वारस दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज करणे भाग झाले आहे. [३] त्याअर्थी सदरील किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार हे **मयत निवृत्ती वसंत दुसाने** यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त **मयत निवृत्ती वसंत दुसाने** यांना आणखी कोणी कायदेशीर वारस असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वत: किंवा आपले वकीलांमार्फत **मे. कोर्टात दि. ०१/०९/२०२६ रोजी प्रत्यक्ष** जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वत: हजर रहावे. जर अर्जदार यांचे व्यतीरिक्त कोणीही वारस नाही असे समजून आल्यास मे कोर्ट पुढील आदेश करतील या कामी आपण हजर न राहील्यास आपले काहीएक म्हणणे नाही असे समजण्यात येवुन आपला बचाव रद्द होणेस प्राप्त होईल.आज दिनांक **१८/०७/२०२६** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिले असे.

सही/- क. लिपीक — कोर्टाचा शिक्का — हुकूमावरुन सही/- सहा.अधिक्षक दिवाणी न्यायालय,क.स्तर जामनेर

---

**CHANGE IN NAME**

MY OLD NAME IS RIFAL FATEMA SAJID KHAN BUT I HAVE CHANGED MY NAME MY NEW NAME IS KHAN RIFAL FATEMA SAJID KHAN JALGAON 42500

**CHANGE IN NAME**

MY OLD NAME IS ZAKERA BI BUT I HAVE CHANGED MY NAME MY NEW NAME IS KHAN ZAKIRA SAJID JALGAON 425001

**CHANGED IN NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM SHAIKH MOHAMMED TAYYAB IBRAHIM" (OLD NAME)TO "TAYYAB IBRAHIM SHAIKH" (NEW NAME). ALL DOCUMENTS ARE BELONG TO MY NAME.

**CHANGED IN NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM "AYESHA BI SHAIKH IBRAHIM" (OLD NAME) TO "AYESHA BI IBRAHIM SHAIKH" (NEW NAME).ALL DOCUMENT ARE BELONG TO MY NAME.

---

**जाहिर नोटीस**

ॲड.एन.जे.तिवारी

भडगाव येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे न्यायालयात

दि.कि.अर्ज नं.६६/२०२६ — चौकशी तारीख ०१/०९/२०२६

**अर्जदार :-** १] रुपाली प्रवीण शिंपी, उ.व.४०, धंदा नोकरी, रा.खुशाल अप्पा नगर, चाळीसगांव रोड, भडगांव ता. भडगांव जि. जळगाव

//विरुध्द//
कोणीही नाही ..... सामनेवाला

**अर्ज:- भारतीय वारसा हक्क अधिनियम चे कलम ३७२ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज**

ज्याअर्थी अर्जदार हि सरनाम्यात नमूद पत्यावरील ठिकाणी राहत असुन **कै.स्वप्नील प्रवीण शिंपी भडगांव येथील कायमचे रहिवासी होते. कै.स्वप्नील प्रवीण शिंपी हे अविवाहित होते. त्यांच्या मृत्यू दि.१८/०४/२०२६ रोजी** भडगाव येथे राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार हि **कै.स्वप्नील प्रवीण शिंपी** यांची आई असून त्यांचे पश्चात वारस असून अर्जदार व्यतिरीक्त अन्य कोणीही वारस नाही. **कै.स्वप्नील प्रवीण शिंपी** यांचे नावे एल.आय.सी.जीवन लाभ पॉलिसी असून त्याचा **पॉलिसी न. ९१४४५५२१७ असा आहे. सदर पॉलिसी र.रु. २०००००/- ची आहे.**त्याकरीता एल.आय.सी.पॉलिसी व शासकीय वारस दाखल्याची आवश्यकता आहे. **कै.स्वप्नील प्रवीण शिंपी** यांचे पश्चात अर्जदार हि वारस आहे. त्यामुळे **कै.स्वप्नील प्रवीण शिंपी** यांचा वारस दाखला मिळणेकामी अर्जदाराला सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल करणे भाग झाले आहे.तरी वरील अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकामी मे. भडगांव न्यायालयात **भारती वारसा कायदा चे कलम ३७२ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. तरी** त्याबाबत कोणाचीही काहीएक हरकत असल्यास त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत भडगाव कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात. अन्यथा कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन मे. कोर्ट योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल .आज दिनांक **२४/०७/२०२६** रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी आमच्या सहीनिशी दिले असे.

सही/- कनिष्ठ लिपीक — कोर्टाचा शिक्का — हुकूमावरुन सही/- सहा.अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय भडगाव जि. जळगाव

---

**नोंदणीचा जाहीरनामा**

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार जळगाव ता.जि. जळगाव

क्र./दंडप्र१/कावि/४२६/२०२६
दिनांक ०३/०८/२०२६

ज्याअर्थी अर्जदार **योगराज कौतिक चौधरी रा. वडनगरी ता. जि. जळगाव यांनी त्यांची आई मंजाबाई उर्फ [मंजुळाबाई] कौतिक चौधरी यांचा मृत्यू दि. १९/०१/२०१९ रोजी वडनगरी ता. जि. जळगांव येथे झालेला असून त्यांची कायदेशीर मृत्यू नोंदणी आदेश** मिळवण्यासाठी अर्ज गटविकास अधिकारी पंचायत समिती जळगांव आला आहे. सदरच्या अर्जाप्रमाणे **मंजाबाई उर्फ [मंजुळाबाई] कौतिक चौधरी यांचा मृत्यू दि. १९/०१/२०१९ रोजी वडनगरी ता.जि.जळगाव येथे झालेला आहे. परंतु सदर मृत्यूनोंद अभिलेखात नसल्याबाबत** ग्रामपंचायत मृत्यू नोंदणी अधिकारी पंचायत समिती, जळगाव यांच्याकडील पत्र **क्र.पंसज/अभिलेख/आर.आर२०५/२०२६ दि. १६/०३/२०२६ सादर केले आहे.**

सदरहू अर्जदार यांची आई **मंजाबाई उर्फ [मंजुळाबाई] कौतिक चौधरी यांची मृत्यू नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहिरनाम्या प्रसिध्दीच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत** त्याने या ग्रामपंचायत, पंचायत समिती येथे हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणी या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती नोंदविल्या नाही तर सदरहू ग्रामपंचायत पंचायत समिती अर्जदार यांची मागणी मृत्यू नोंदी बद्दल नोंदणी बदल लागलीच पुरावा देऊन त्यांची नोंदणी शाबित दिसल्यास अर्जदाराच्या मागणीनुसार मृत्यू नोंदणीबाबत आदेश देईल. **दिनांक ०५/०८/२०२६ रोजी** माझ्या सही व मे ग्रामपंचायत यांच्या सहीनिशी दिले आहे.

आदेशावरुन सही/- कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार जळगाव ता.जि.जळगाव

---

जन्म नोंदणीचा जाहीरनामा

**जाहीरनामा**

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार चोपडा जि. जळगाव यांचे न्यायालयात

फौ.कि.अ.नं.०३/२०२६

अर्जदार - पवन दिली पाटील, वय ३३ ,व्यवसाय - मजुरी, रा.अडावद जि.जळगाव

//विरुध्द//
जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रा.पं.अधिकारी अडावद ता.चोपडा जि.जळगांव ... सामनेवाला

ज्यापेक्षा अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी करुन मिळण्यासाठीचा अर्ज मे.न्यायालयात केला असून त्यात **अर्जदार नामे श्री. पवन दिलीप पाटील रा. अडावद ता. चोपडा जि. जळगाव यांनी त्यांची मुलगी नामे -गुंजन पवन पाटील हीचा जन्म दिनांक ०१/०९/२०२० रोजी मौजे अडावद ता.चोपडा जि. जळगाव येथे झाला आहे.** मात्र अर्जदाराच्या स्वत:च्या जन्म तारखेची नोंद जन्म मृत्यू नोंदणी अधिकरी तथा ग्रा.पं.अधिकारी अडावद ता. चोपडा जि. जळगाांव येथे आढळून आली नाही. म्हणून अर्जदार अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

**सदरहू वरील अर्जदार यांच्या मुलीच्या जन्म नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहीरनामा प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत** त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार मृत्यू नोंदणीबद्दल लागलीच पुरावा देवून त्यांची नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराच्या मागणीनुसार मृत्यू नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल. **आज दिनांक २४/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व मे. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.**

आदेशावरुन सही/- [भाऊसाहेब थोरात] कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार चोपडा जि. जळगांव

---

**जाहीर नोटीस**

ॲड.एम.डी.सपकाळे

जामनेर येथील मे. दिवाणी न्यायाधीश [एम.एस.जयस्वाल] क. स्तर जामनेर यांचे कोर्टात जि. जळगाव

दि.कि.अर्ज नं.१२७/२०२६
निशाणी ०७

**अर्जदार :- १]** आशा अशोक सुरवाडे, उ.व.६३, धंदा-घरकाम, रा. जळांद्री बु.।। ता.जामनेर जि. जळगाव

//विरुध्द//
कोणीही नाही ..... सामनेवाला

**अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारस दाखला मिळणेकरीता अर्ज**

१] **अशोक गणपत सुरवाडे यांचा मृत्यू दि. १३/१०/२०२५ रोजी मौजे जामनेर ता. जामनेर येथे झालेला आहे. अर्जदार ही मयत अशोक गणपत सुरवाडे यांची पत्नी आहे. मयत अशोक गणपत सुरवाडे यांची आई ही देखील यापुर्वीच मयत झालेली आहे. मयतास अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत.**या अर्जदारांव्यतिरिक्त त्यांना अन्य कुणीही वारस नव्हते व नाही. [२] अर्जदार यांना वेगवेगळया शासकिय व निमशासकिय कामासाठी अर्जदार हे मयताचे वारस असल्याबाबत वारस दाखल्याची नितांत आवश्यकता भासत आहे व भविष्यातही भासणार आहे. त्यासाठी अर्जदार हे संबंधीत अधिकारी यांचेकडे मयताचे अर्जदार हे वारस असल्याचा वारस दाखला घेण्यासाठी गेले असता त्यांनी न्यायालयातुन वारस दाखला काढण्यास सांगितले.सबब सदरचा अर्ज दाखल करणे भाग झाले आहे. त्याअर्थी सदरील किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार हे **मयत अशोक गणपत सुरवाडे** यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त **मयत अशोक गणपत सुरवाडे** यांना आणखी कोणी कायदेशीर वारस असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वत: किंवा आपले वकीलांमार्फत **मे. कोर्टात दि. २४/०८/२०२६ रोजी प्रत्यक्ष** जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वत: हजर रहावे. जर अर्जदार यांचे व्यतीरिक्त कोणीही वारस नाही असे समजून आल्यास मे कोर्ट पुढील आदेश करतील या कामी आपण हजर न राहील्यास आपले काहीएक म्हणणे नाही असे समजण्यात येवुन आपला बचाव रद्द होणेस प्राप्त होईल.आज दिनांक **२९/०७/२०२६** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिले असे.

सही/- क. लिपीक — कोर्टाचा शिक्का — हुकूमावरुन सही/- सहा.अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय,जामनेर


लोकशाही दैनिक हे लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीचे असून त्यांच्या वतीने मुद्रक आणि संपादक शांता कमलाकर वाणी, प्रकाशक राजेश कमलाकर यावलकर यांनी लोकशाही ऑफसेट एम-१६९ , एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
Lokshahi Dainik is owned by Lokshahi Innovations Private Limited and is Printed by the Printer and Editor - Shanta Kamlakar Wani Publisher - Rajesh Kamlakar Yawalkar, at Lokshahi Offset M-169, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra) and published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra. आर.एन.आय.नं MAHMAR/2009/33028 पोस्टल रजी. नंबर No.JAL/16/2024-26 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १६ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८. संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.

लोकशाही

## संपादकीय

# चौधरी–महाजन ऑडिओ क्लिप पक्षांतर्गत गटबाजीचे प्रदर्शन!

नंदुरबार येथील भाजपचे प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी आणि भाजपचे संकटमोचक म्हणून ओळखले जाणारे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्यातील टेलिफोनवरील ऑडिओ क्लिप व्हायरल झाली असून ती सध्या फार गाजत आहे. नंदुरबारचे विजय चौधरी यांनी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्याविषयी त्यांच्या मनात जे होते ते सारे या क्लिपमधून समोर आले आहे. रक्षा खडसे, रोहिणी खडसे आणि एकनाथराव खडसे यांच्याविषयी ज्या अश्लील भाषेत बोलले आहे, ते अत्यंत किळसवाणे आहे. महिलांविषयी आपण काय बोलत आहोत, याचे साधे भानही विजय चौधरी यांना राहिले नाही. ते फोनवरून गिरीश महाजन यांच्याशी संवाद साधत आहेत आणि गिरीश महाजन हे त्यांना फक्त होकारार्थी, सकारात्मक उत्तर देत आहेत. विजय चौधरी यांनी रक्षा खडसे आणि रोहिणी खडसे यांच्याविषयी अश्लील भाषेत जे वक्तव्य केले, त्याला महाजन यांनी फक्त होकारार्थी उत्तर दिले. मात्र, महाजन यांनी विजय चौधरी यांच्या बोलण्याला कुठेही विरोध दर्शवला नाही. किंबहुना, ‘‘खडसे यांनी राजीनामा मागितला पाहिजे,‘‘ असे विजय चौधरी म्हणतात. त्यावर ‘‘बघा पुढे काय होईल,‘‘ असे बोलून महाजन यांनी आपली संयमी भूमिका दर्शवली. विजय चौधरी यांनी खडसे परिवाराविरुद्ध बोलून ते थांबले नाहीत. त्यांनी नंदुरबारचे भाजप नेते डॉ. विजयकुमार गावित आणि त्यांची कन्या हिना गावित यांच्याविषयीसुद्धा फोनवरून आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे. ‘‘विजयकुमार गावित हा भाजपचा पक्ष बुडवायला निघाला आहे. त्यांची मुलगी हिना गावित ही लोकसभेत काँग्रेस उमेदवाराविरुद्ध पराभूत झाली. भाजप पक्ष म्हणजे आपलीच प्रॉपर्टी,‘‘ अशा भाषेचा त्यांनी वापर केला आहे. याबाबतीतही मंत्री गिरीश महाजन यांनी तशीच मूक संमती दर्शवली आहे. मात्र, खडसे परिवाराच्या बाबतीत जे वक्तव्य केले गेले, ते अशोभनीय आहे. याबाबत रोहिणी खडसे यांनी आपली प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, भाजप नेत्यांच्या तोंडून कटू भाषा वाहत आहे. जी भाषा बोलायला नको, ती त्यांनी बोलून बडबड केली आहे. ‘‘माझे भाजपमधील महिलांना आवाहन आहे की, हे तुमचे नेते कसे बोलतात, कसे वागतात, हे तुम्हीच ठरवा. भाजपमधील महिलांनी जरा जपून राहावे,‘‘ अशा शब्दांत रोहिणी खडसे यांनी आपली तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. मात्र, या संदर्भात एकनाथराव खडसे यांनी अद्याप कोणतेही वक्तव्य केलेले नाही, हे विशेष होय. ही चौधरी आणि महाजन यांच्यातील ऑडिओ क्लिप खरी असल्याचे बोलले जात आहे. मात्र, या संदर्भात विजय चौधरी यांचे ट्विटर हँडल वापरणारे पीए यश टिपरे यांना पुण्यातून अटक करण्यात आली आहे. ते बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील रहिवासी असून त्यांना पुणे येथून नंदुरबार पोलिसांनी ताब्यात घेऊन नंदुरबार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. याबाबतीत नंदुरबार पोलिसांनी अत्यंत गुप्तता पाळली असून, यश टिपरे यांच्या संदर्भात माध्यमांनी काही लिहिले तर ते सहन केले जाणार नाही, असे नंदुरबारच्या पोलीस अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. याव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीने यश टिपरे यांच्या संदर्भात काहीही लिहू किंवा प्रसारित करू नये, असे प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे. कारण यापूर्वी विजय चौधरी यांची खोटी ऑडिओ क्लिप यश यांच्या माध्यमातून व्हायरल करण्यात आली होती. ती क्लिप मात्र खोटी व बनावट असल्याचे निदर्शनास आले होते.

या संदर्भात चौधरी आणि महाजन यांच्या ऑडिओ क्लिपमधून भाजप पक्षांतर्गत गटबाजीचे प्रदर्शन झाले आहे. म्हणजे भाजपमधील एक गट आपल्याला नको आहे, हेच विजय चौधरी यांच्या वक्तव्यांतून जाणवते. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी विजय चौधरी यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबतीत लेवा पाटीदार समाजाच्या वतीने नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयावर एक प्रचंड मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात पुरुष आणि महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नंदुरबार जिल्ह्याच्या कन्या तथा केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या समर्थनार्थ नंदुरबार जिल्ह्यातील सर्व लेवा पाटीदार व गुजर समाजाच्या वतीने हा मोर्चा काढण्यात आला होता. मोर्चा अत्यंत शांततेच्या मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालयावर गेला. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांचे चरित्रहनन करणाऱ्या विजय चौधरी यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. येत्या आठ दिवसांत ही कारवाई झाली नाही, तर आम्ही यापेक्षा अधिक संख्येने तुमच्या कार्यालयावर येऊ आणि त्यावेळी विजय चौधरी यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे, असेही निवेदनात म्हटले आहे. मोर्चा अत्यंत शांततेत पार पडला. नंदुरबार जिल्ह्यात खरेतर रघुवंशी आणि विजयकुमार गावित यांचे हाडवैर आहे. मात्र, त्याऐवजी विजय चौधरी यांच्या संदर्भातील ही ऑडिओ क्लिप व्हायरल झाली. एकंदरीत गिरीश महाजन आणि रक्षा खडसे यांचे जिल्हा परिषद निवडणुकीतील उमेदवारीवरून मतभेद होते, असे यावरून दिसून येते. पण जे काही चालले आहे, ते भाजप पक्षाच्या दृष्टीने सर्व काही आलबेल असल्याचे वाटत नाही. पाहूया, भाजपचे वरिष्ठ नेते याबाबतीत कोणती ॲक्शन घेतात. त्यांच्यावरच सर्वकाही अवलंबून आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे शक्य झाले यकृत प्रत्यारोपण

## पत्नीच्या यकृतदानातून पतीला मिळाले नवजीवन : मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी शस्त्रक्रिया

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई प्रतिनिधी



आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य झाले होते. उपचारासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपयांची आवश्यकता असताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांनी स्वतःच्या यकृताचा काही भाग दान करून पतीला नवजीवन दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून प्रशांत इंगळे यांच्यासाठी २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टाटा ट्रस्टकडून १९ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदतही उपलब्ध झाली. त्यामुळे एकूण २१ लाख ६० हजार रुपयांचा निधी उभारला गेला आणि अत्यंत खर्चिक असलेले यकृत प्रत्यारोपण शक्य झाले. प्रशांत इंगळे हे अकोला येथे केबल टाकण्याचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबात वृद्ध आई-वडील, पत्नी, महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुलगी आणि दहावीत शिकणारा मुलगा आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ दरम्यान त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला. अकोला आणि नागपूर येथे झालेल्या वैद्यकीय तपासण्यांनंतर त्यांचे यकृत गंभीररीत्या निकामी होत असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी तातडीने यकृत प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. मात्र, लाखो रुपयांचा उपचार खर्च कुटुंबाच्या आर्थिक क्षमतेबाहेर होता. अशा कठीण परिस्थितीत पत्नी वर्षा इंगळे यांनी कुटुंबीयांसह अकोल्याच्या आमदारांची भेट घेतली. त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती देत मुंबईत उपचारासाठी जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची भेट घेतली. नाईक यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच टाटा ट्रस्टकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला. या आर्थिक सहाय्यामुळे २५ जून २०२६ रोजी मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाल्याने १३ जुलै २०२६ रोजी प्रशांत इंगळे यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते हळूहळू पूर्णपणे बरे होत आहेत.

वेळेवर मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे आपल्याला नवजीवन मिळाल्याची भावना व्यक्त करत इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक तसेच टाटा ट्रस्ट यांचे मनःपूर्वक आभार मानले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचार पैशांअभावी थांबू नये, या उद्देशाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. त्याच भावनेतून प्रशांत इंगळे यांना वेळेत आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून देता आली, याचा आम्हाला आनंद आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहितीसाठी नागरिकांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

**–रामेश्वर नाईक**
**कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष**

# मोसंबी पिकात पाणी साचल्याने नुकसान

लोकशाही न्यूज नेटवर्क
भडगाव प्रतिनिधी

तालुक्यातील बांबरुड प्र. ब. शिवारातील इंद्रसिंग छगनसिंग परदेशी यांचे गट नं. १५०/१ शेतातील साडेतीन एकर मोसंबी पिकाच्या शेतात पाऊसाचे पाण्याचे तलाव साचलेले आहेत. पाणी साचल्याने मोसंबी झाडावरील मोसंबी फळ मोठया प्रमाणात गळती होत मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे या शेतकर्यावर मोठे संकट कोसळलेले आहे. तरी महसुल व कृषी विभागाने तात्काळ मोसंबी पिकाची पाहणी करुन पिक नुकसानीचे पंचनामे करावेत. तसेच शासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी या शेतकरी कुटुंबातुन होत आहे.



# हॉटेल मालकाकडून मजुराचा काठीने ठेचून खून

## थकीत पगाराची मागणी : उचंदा शिवारातील घटना

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुक्ताईनगर प्रतिनिधी

थकीत पगाराची मागणी केल्याचा राग मनात धरून हॉटेल मालकाने मजुराच्या डोक्यात लाकडी काठीने वार करत त्याची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना मुक्ताईनगर-बुऱ्हानपूर महामार्गावरील उचंदा शिवारात घडली. या प्रकरणी हॉटेल मालकाविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी सध्या फरार आहे. मृत मजुराचे नाव गोकुळ तारासिंग जाधव (वय ५५, मूळ रा. निंबापूर, ता. खकनार, जि. बुऱ्हानपूर, ह.मु. पुर्णाड शिवार) असे आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोकुळ जाधव हे पुर्णाड फाट्यावरील शेर-ए-पंजाब हॉटेलमध्ये मजूर म्हणून काम करत होते. शनिवारी मध्यरात्री सुमारे १ वाजण्याच्या सुमारास मुक्ताईनगर-बुऱ्हानपूर महामार्गालगत उचंदा शिवारातील एकनाथ पाटील यांच्या शेताजवळील सिटिझन गॅरेज परिसरात त्यांनी हॉटेल मालक कमलजितसिंग प्रितमसिंग याच्याकडे थकीत पगाराची मागणी केली. याच कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. संतापलेल्या कमलजितसिंग याने लाकडी काठीने गोकुळ जाधव यांच्या डोक्यावर जोरदार प्रहार केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेनंतर मृताच्या पत्नी सुमित्राबाई गोकुळ जाधव (वय ५५) यांनी मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या तक्रारीवरून आरोपी कमलजितसिंग प्रितमसिंग याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर आरोपी फरार झाला असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके रवाना केली आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. पाटील करीत आहेत.

# पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत अनुभूती इंग्लिश स्कूलच्या तीन विद्यार्थिनींचे यश

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी



गुणवत्तापूर्ण शिक्षणाची उज्ज्वल परंपरा जोपासणाऱ्या अनुभूति इंग्लिश मिडीयम स्कूलने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील भार्गवी रुपेश पवार, काव्या शामकांत पाटील, विद्या विनोद बागुल या विद्यार्थिनी शहरी सर्वसाधारण गटाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्या आहेत. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, अनुभूती स्कूलचे अध्यक्ष अतुल जैन, संचालिका निशा जैन तसेच विद्यालयाच्या प्राचार्या रश्मी लाहोटी यांनी कौतूक केले. या विद्यार्थिनींना राजेंद्र बावस्कर, चित्रलेखा अत्तरदे, वंदना मारकड, गीतांजली काळे या शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींनी नियमित व नियोजनबद्ध अभ्यास, सातत्यपूर्ण सराव आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा प्रभावी उपयोग करून हे उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थिनींची जिद्द, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि विद्यालयाचे गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण यांच्या एकत्रित प्रयत्नांतून मिळालेले हे यश विद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीतील आणखी एक गौरवास्पद पर्व ठरले आहे.

# सायबर सुरक्षा जनजागृती अभियानास प्रतिसाद

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुक्ताईनगर प्रतिनिधी



जे.ई स्कुल ज्युनीअर कॉलेज येथे इयत्ता ११ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक विकास चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या सत्रात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील विद्यार्थिनी प्रांजल मराठे, भाग्यश्री बढे यांनी क्विक हील फाऊंडेशनचा सायबर वॉरियर उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, ओटीपी व पासवर्ड सुरक्षितता, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि सायबर गुन्ह्यांपासून बचाव याविषयी मार्गदर्शन केले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्राला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या शेवटी मा. कणखरे सर यांनी मार्गदर्शकांचे आभार मानत विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल व्यवहार करण्याचे आवाहन केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरला.

# अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका व मदतनीसांची कार्यशाळा

लोकशाही न्यूज नेटवर्क
चंद्रपूर प्रतिनिधी



जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियानांतर्गत मार्गदर्शन कार्यक्रम व कार्यशाळेचे आयोजन ३० जुलै २०२६ रोजी भवानजीभाई हायस्कूल, चंद्रपूर येथे करण्यात आले. या कार्यशाळेत जिल्हाभरातील सुमारे ५०० पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका व मदतनीस सहभागी झाल्या. बालभिक्षेकरी, बालकामगार, अल्पवयीन माता, पॉक्सो अत्याचारग्रस्त बालके तसेच बालविवाहाच्या घटना आढळल्यास तात्काळ चाईल्ड हेल्पलाईन १०९८, महिला हेल्पलाईन १८१, जिल्हा बाल संरक्षण कक्ष किंवा पोलिस प्रशासनाला माहिती देण्याचे आवाहनही त्यांनी केले. प्रमुख अतिथी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी (शहरी), चंद्रपूर प्रकाश भांदककर यांनी सखी वन स्टॉप सेंटर, चाईल्ड हेल्पलाईन १०९८, महिला हेल्पलाईन १८१, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, महिला सक्षमीकरण केंद्र, शक्तिसदन, स्वाधार महिला निवासगृह आणि वर्किंग वुमन हॉस्टेल यांच्या कार्याची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा क्षमा बासरकर आणि सदस्या ज्योत्स्ना माहितकर यांनी उपस्थित पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्याशी संवाद साधत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोरेश्वर झोडे, अतिशकुमार चव्हाण, सायली पाटील, अजय साखरकर, अभिषेक मोहुर्ले, कल्याणी रायपुरे, शारदा चट्टे यांच्यासह सखी वन स्टॉप सेंटर, शक्तिसदन, स्वाधार महिला निवासगृह, जिल्हा व रेल्वे चाईल्ड हेल्पलाईन, महिला सक्षमीकरण केंद्र तसेच भवानजीभाई हायस्कूलचे प्राचार्य, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. सूत्रसंचालन पपीहा महाकाळकर यांनी केले. प्रास्ताविक मोरेश्वर झोडे यांनी, तर आभार प्रदर्शन भास्कर ठाकूर (पर्यवेक्षक, रेल्वे चाईल्ड हेल्पलाईन) यांनी केले.

# जन्म-मृत्यू नोंदणीत प्रशासनाचा हलगर्जीपणा

## नागरिकांना वर्षभर हेलपाटे : कारवाईची मागणी



लोकशाही न्यूज नेटवर्क
चंद्रपूर प्रतिनिधी

जन्म व मृत्यू नोंदणीसारख्या अत्यावश्यक शासकीय सेवेत होत असलेल्या दिरंगाईमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचा आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने करण्यात आला आहे. या संदर्भात महिला जिल्हाध्यक्षा किरणताई गेडाम यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करूनही अनेक जन्म व मृत्यू नोंदणीची प्रकरणे सहा महिने ते वर्षभर प्रलंबित ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे नागरिकांना वारंवार शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागत असून प्रशासनाच्या दिरंगाईमुळे मानसिक, आर्थिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित यंत्रणेकडून होत असलेला विलंब गंभीर असून यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होत असल्याचे पक्षाने निवेदनात म्हटले आहे. प्रलंबित सर्व प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी, विलंबास जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच भविष्यात अशा प्रकारची निष्काळजीपणा पुन्हा होणार नाही यासाठी जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी मागणी आरपीआय (आठवले)च्या वतीने करण्यात आली. यावेळी हंसराज वनकर, ॲड. मुरलीधर आमटे, ॲड. शैलेंद्र देशकर, किरण घाटे, रमेश अंबादे, रीमा सिंह, बिंदुताई गडलिंग, शांती राजू रॉय, तृप्ती कुळमेथे, अंजली काटवले, कविता शेडमाके, मंगला थेरकर, सुप्रिया गिरी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नागरिकांच्या हक्काशी संबंधित या प्रश्नाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)च्या वतीने देण्यात आला.

# मासे दगावल्याच्या नावाखाली उद्योजकांना नाहक त्रास!

## मन्यारखेडा तलाव प्रकरण : सखोल चौकशी करण्याची मागणी

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

तालुक्यातील मन्यारखेडा येथील तलावामध्ये मासे दगावल्याच्या कारणावरून परिसरातील १६ उद्योजकांना प्रशासनाकडून नाहक त्रास दिला जात आहे. उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडून दि. २३/०७/२०२६ रोजी मत्स उत्पादक अर्जदार साहेबराव माणिक सैंदाणे यांच्या तक्रारीवरून सन २०२३ च्या कलम १५२ अन्वये सुनावणी नोटीस बजावण्यात आली आहे. या कारवाईमुळे स्थानिक उद्योजक व शेकडो कामगार तीव्र आर्थिक व मानसिक संकटात सापडले आहेत.

या संदर्भात उद्योजकांनी पत्रपरिषदेत आपल्या व्यथा मांडतांना सांगितले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनेनुसार सर्व उद्योजकांनी स्वखर्चाने ईपीटी मशिन बसवलेले असून कायदेशीर नियमांचे पूर्ण पालन करून उद्योग चालवले जात आहेत. मन्यारखेडा तलावामध्ये केवळ या उद्योगांचेच नव्हे तर कुसुंबा, रायपूर, साईनगर, सुप्रीम कॉलनी व परिसरातील जवळपास ५०० ते ६०० लहान-मोठ्या घटकांचे सांडपाणी येते. शिवाय तलावाच्या सभोवताली असलेली २०० ते ३०० एकर वहिवाटीची शेती असून, पावसाळ्यात शेतात वापरलेली रासायनिक खते व कीटकनाशके वाहून तलावात येतात. याचा दुष्परिणाम माशांवर होत असण्याची दाट शक्यता असताना केवळ १६ उद्योजकांनाच टार्गेट का केले जात आहे? कारखाने व उद्योग वर्षभरात १२ महिने अविरत सुरु असतात. जर उद्योगांच्या पाण्यामुळे प्रदूषण होत असेल, तर मासे वर्षातून एकदाच कसे दगावतात? ठराविक काळातच मासे मरण्याचे दाखवून संगनमताने शासकीय अनुदान लाटण्याचा हा प्रकार तर नाही ना? याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. १२ हेक्टर क्षेत्रफळ असलेल्या तलावात फक्त १ ते २ टन मासे दगावण्यामागे नेमके काय कारण आहे, याचे खरे-खोटे समोर आले पाहिजे. यावेळी उद्योजकांनी मन्यारखेडा तलावातील मासे दगावण्याच्या घटनेची निष्पक्ष तज्ज्ञांमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, शासकीय अनुदान लाटण्याच्या उद्देशाने खोट्या तक्रारी करणाऱ्यांवर व या प्रकरणात सामील असणाऱ्या घटकांची चौकशी व्हावी, नियमांचे पालन करणाऱ्या १६ उद्योजकांवर होणारी एकतर्फी व अन्यायकारक कारवाई तात्काळ थांबवण्यात यावी, उद्योगांवर अवलंबून असणाऱ्या शेकडो कामगारांच्या रोजगाराचे रक्षण करून उद्योजकांना कायमस्वरूपी न्याय द्यावा या सर्व प्रकाराची वस्तुस्थिती (खरे-खोटे) समोर यावी अशी मागणी केली आहे. यावेळी उद्योजक रवींद्र फालक, संतोष इंगळे, मधुकर महाजन, दत्तु मराठे, रमेश सोनार, कैलास पाटील, सतीलाल पाटील, संदीप वाघ, चंद्रकांत कोल्हे, संतोष कोळी यांच्यासह उद्योजक उपस्थित होते.





# शेतमजुराचा पोस्ट तिकिटांचा संग्रह



प्रत्येक व्यक्ती आपल्या आयुष्यात कोणता ना कोणता छंद जोपासत असतो. शहरी भागात लहानपणापासून मुलांना असे छंद जोपासायची सवय लागलेली असते. मात्र माढा तालुक्यातील लऊळसारख्या ग्रामीण भागातील एका शेतमजुराने जोपासलेला देशी-विदेशी पोस्टाच्या तिकिटांचा संग्रह खरंच कौतुकास्पद आहे. महादेव डांगे यांची माढा तालुक्यातील लऊळ येथे २२ गुंठे शेती आहे. घरची हलाखीची परिस्थिती असल्याने शाळकरी वयापासून मजुरीची सवय असलेले महादेव यांना चौथीमध्ये शिकत असताना पोस्टाच्या तिकिटाचे महत्व एका प्रसंगावरून समजले आणि तेव्हापासून त्यांना ही तिकिटे संग्रह करण्याचा नादच लागला. गेली ४० वर्षे महादेव यांनी हा छंद जपला जोपासलाच नाही, तर या तिकिटांसाठी आलेली लाखो रुपयांची ऑफर धुडकावून त्यांनी पुढच्या पिढीसाठी हा संग्रह जपून ठेवला आहे.म हादेव डांगे यांचे कुटुंब लऊळ जवळील एका वस्तीवरील झोपडीत राहतात. वडिलोपार्जित २२ गुंठे शेतीत कुटुंबाचा चरितार्थ चालणे अवघड असल्याने मुलगा आणि महादेव हे दोघेही मजुरीचे काम करतात. महादेव हे चौथीमध्ये असताना त्यांना एक पोस्टाचे जुने तिकीट मिळाले होते. हे तिकीट त्यांच्याकडून एकाने दीड रुपायाला विकत घेतले आणि ही तिकिटं खूपच मौल्यवान असतात. याचा महादेव यांना साक्षात्कार झाला. मग लऊळसारख्या भागात राहूनही शाळकरी म हादेव यांनी तिकिटं गोळा करण्यास सुरुवात केली. तरुणपणी कामासाठी महादेव पुण्यात स्थलांतरित झाले. इथे काम करताना अशी पुरातन तिकिटांच्या शोधातच असे. पेंटिंगचे काम करताना पुणे आणि परिसरात लोकांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवत त्यांच्याकडून मजुरी कमी मिळाली तरी घ्यायची, मात्र त्यांच्याकडे असलेल्या जुन्या पाकिटांवरील तिकिटे मात्र ते न लाजता मागून घेत. महादेव यांची ही आवड पाहून पुण्यातील कॅम्प परिसरात काम करताना, त्यांना अनेक विदेशी तिकिटे मि ळाली. महादेव यांची आवड पाहून पुण्यातील एका निवृत्त अधिकाऱ्याने त्यांच्याजवळील काही जुनी तिकिटांचा संग्रह दिल्यावर आभाळाला गवसणी घातल्याचा आनंद महादेव याला झाला. काही दिवसातच म हादेव यांच्याकडे भारत, पाकिस्तान, इंग्लंड, फ्रांस, आफ्रिका अशा अनेक देशातील पुरातन तिकिटांचा संग्रह तयार झाला. काही वर्षांपूर्वी त्याच्याकडील तिकिटांचा संग्रहाची माहिती घेऊन कोलकात्याच्या एका डॉक्टरने फोन करून सर्व तिकिटांचा संग्रह दोन कोटी रुपयांना मागितला होता. हातावर पोट असणाऱ्या कोणालाही ही रक्कम फारच मोठी असते, मात्र तरीही महादेव यांनी आपली जपलेली आवड विकण्यास नकार दिला. आज महादेव यांनी वयाची पन्नाशी गाठली आहे. गेली ४० वर्षे जपलेला आपला हा संग्रह शाळेतील विद्यार्थ्यांनी पाहावा याची माहिती घ्यावी हा त्यांचा उद्देश होता. आता ते पुन्हा आपल्या लऊळ या गावी येऊन पुन्हा आपल्या भागात मजुरी करू लागले आहेत. आता त्यांचा मुलगाही मजुरीला जातो, पण हे तिकिटांच्या संग्रहाचे त्यांचे वेड आजही तसेच आहे. आजही महादेव आणि त्यांच्या पत्नीने हा संग्रह झोपडीतील एका पेटाऱ्यात जपून ठेवला आहे. आपला संग्रह ग्रामीण भागातील मुलांनी पाहावा आणि त्यातून माहिती घ्यावी ही त्यांची इच्छा असली तरी आजच्या मोबाईलच्या जमान्यात महादेव यांच्या तिकिटांचा संग्रह या मुलांसाठी आजही आऊट ऑफ कव्हरेज आहे.

# टाटा मोटर्सच्या विक्रीत वार्षिक ३७% वाढ

टाटा मोटर्स लिमिटेडची जुलै २०२६ मधील देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील एकूण विक्री ३९,६४१ वाहने इतकी होती; जुलै २०२५ मधील २८,९५६ वाहनांच्या तुलनेत ही ३७% वार्षिक वाढ आहे.जुलै २०२६ मध्ये चकाखउत (मध्यम आणि जड व्यावसायिक वाहने) ची देशांतर्गत विक्री १५,४३५ वाहने होती, जी जुलै २०२५ मध्ये १२,३७८ वाहने होती (२५% वार्षिक वाढ). जुलै २०२६ मध्ये चकाखउतची देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विक्री १६,३६४ वाहने होती, जी जुलै २०२५ मध्ये १३,६६९ वाहने होती (२०% वार्षिक वाढ).१८०




अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या टाटा समूहाचा भाग असलेली टाटा मोटर्स लिमिटेड ही युटिलिटी वाहने, पिक-अप्स, ट्रक्स आणि बसेसची भारतातील सर्वात मोठी आणि जागतिक स्तरावर प्रसिद्ध उत्पादक कंपनी आहे. व्यावसायिक वाहतूक क्षेत्रात आठ दशकांहून अधिक काळ नेतृत्व करणाऱ्या या कंपनीची ओळख तिच्या नाविन्यपूर्णता, विश्वासार्हता आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी आहे. त्यांची प्रगत पॉवरट्रेन्स, कनेक्टेड तंत्रज्ञान आणि 'इंटेलिजंट फ्लीट सोल्युशन्स' (वाहन ताफा व्यवस्थापन उपाय) विविध प्रकारच्या सेवांना उदा. 'लास्ट-माईल डिलिव्हरी'पासून ते सार्वजनिक वाहतुकीपर्यंत सक्षम करतात आणि त्याच वेळी देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देतात. 'बेटर ऑलवेज' (नेहमीच अधिक चांगले) या ब्रँड वचनानुसार, टाटा मोटर्स भविष्यासाठी सज्ज असे उपाय (सोल्युशन्स) प्रदान करते, ज्यामुळे ग्राहकांचा अनुभव सुधारतो आणि शाश्वत विकासाला चालना मिळते.

# शोध चपलेचा

चप्पल किंवा सँडलचा शोध कोणत्याही एका व्यक्तीने लावलेला नाही, तर मानवाने चालताना पायांचे रक्षण व्हावे म्हणून वेगवेगळ्या प्राचीन संस्कृतींमध्ये वेगवेगळ्या साहित्याचा वापर करून तिचा विकास केला. संशोधकांच्या मते सर्वात आधीच्या चपलांचे पुरावे इजिप्तमध्ये सापडतात. तिथे ताडाची पाने, झाडांची छाल आणि 'पपीरस' नावाच्या वनस्पतीपासून सँडल बनवले जात असत. अमेरिकेतील ओरेगन येथील फोर्ट रॉक गुहेत वनस्पतींच्या सालीपासून विणलेल्या अत्यंत प्राचीन चप्पलांचे अवशेष सापडले आहेत, जे हजारो वर्षे जुने आहेत. चीनमध्ये ४७०० ईसा पूर्व चमडे, कापूस आणि झाडांच्या धाग्यांपासून चपला बनवल्या गेल्या. ग्रीस व रोमन संस्कृतीत चप्पल हे सामाजिक दर्जाचे प्रतीक मानले जात होते. आपल्याकडे प्राचीन काळी लाकडाच्या खडावा वापरता असत. त्यानंतर अनेक वर्षांनी चामड्यापासून चपला बनू लागल्या.आणि आता आधुनिक काळात तर प्लास्टिक,रबर,फायबर अशा अनेक धातूपासून चप्पल बनविल्या जाऊ लागल्या आहेत.





संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल - subodh.ranshevre@rediffmail.com

# तक्रार दाखल होऊन महिनाभर उलटला; तरी कारवाई शून्य!




**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

मुक्ताईनगर नगरपंचायतीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे प्रकरण समोर आले आहे. एक लेखी तक्रार एका नागरिकाने दि. १ जुलै २०२६ रोजी नगरपंचायतीकडे दाखल केली. मात्र महिना उलटूनही या तक्रारीवर कोणतीही ठोस प्रशासकीय कारवाई झालेली नसल्याने तक्रारदाराने पुन्हा मुख्य अधिकाऱ्यांना याबाबत स्मरण तक्रार पत्र दिले त्यानंतरही अद्याप पर्यंत कारवाई झालेली नाही. असा आरोप तक्रारदाराने केला आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, पहिल्या तक्रारीनंतरही कोणतीही कार्यवाही न झाल्याने नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना स्मरणपत्र देण्यात आले. त्यानंतर मुख्याधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा केली असता, ''संबंधित अर्ज बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला असून ते आवश्यक ती कारवाई करतील,'' असे सांगण्यात आले. मात्र बांधकाम विभागाकडे चौकशी केली असता, ''ही तक्रार आमच्या कार्यक्षेत्रातील नाही. हा विषय आरोग्य व पाणीपुरवठा विभागाचा आहे,'' असे उत्तर देण्यात आले. त्यानंतर आरोग्य व पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधला असता, ''हा विषय आमच्या कार्यक्षेत्रात येत नाही,'' असे सांगण्यात आले. यामुळे एकाच तक्रारीवर दोन विभागांनी जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी नेमका जबाबदार अधिकारी कोण, असा मूलभूत प्रश्न निर्माण झाला आहे. तक्रारदाराने असा सवाल उपस्थित केला आहे की, मुख्याधिकाऱ्यांचे आदेश प्रत्यक्षात अंमलात का येत नाहीत? विभागांमध्ये समन्वयाचा अभाव आहे का? की नागरिकांच्या तक्रारी केवळ कागदावरच फिरत आहेत? आता या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर चौकशी करून जबाबदारी निश्चित केली जाईल का, याकडे मुक्ताईनगरकरांचे लक्ष लागले आहे.

# नशा मुक्ती अभियानात सर्वांनी सहभाग घ्यावा!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपूर ता. रावेर** प्रतिनिधी

येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागामार्फत माय भारत पोर्टलची माहिती कार्यक्रम मा. प्राचार्य डॉ. जे बी अंजने यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिसभा सदस्य दिनेश चव्हाण होते. यावेळी दिनेश चव्हाण, उप प्राचार्य डॉ. एस एन वैष्णव तसेच डॉ. एस ए पाटील यांनी प्रभावी




मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात मा. प्राचार्य डॉ. जे बी अंजने यांनी माय भारत पोर्टल वरील नशा मुक्ती अभियानाची लिंक कशी भरावी हे सांगितले व प्रत्येकाने निरव्यसनी जीवन जगावे असे सांगितले

या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन प्रा. हेमंत बाविस्कर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. जे पी नेहेते यांनी केले. या कार्यक्रमाला डॉ. डी बी पाटील, डॉ. पी आर महाजन प्रा. एस आर इंगळे, डॉ. जे पी नेहेते, डॉ. . एस बी पाटील, डॉ. पी आर गवळी, डॉ. रामटेक, प्रा. एस पी उमारीवड, डॉ. एन यू बारी, प्रा. प्रदीप तायडे, प्रा. अक्षय महाजन, प्रा. एस बी महाजन हे उपस्थित होते. तर हर्षल पाटील, श्रेयस पाटील व अनुराग पाटील यांनी मेहनत घेतली.

# खोटा कॉल करून पोलिसांची दिशाभूल; युवकावर गुन्हा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चोपडा** प्रतिनिधी

चोपडा शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत डायल ११२ वर खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल केल्याप्रकरणी एका युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ ते रात्री १० या वेळेत पोलीस कॉन्स्टेबल अतुल अनिल मोरे व पोलीस कॉन्स्टेबल योगेश कोळी हे डायल ११२ वर प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी कर्तव्यावर होते. दुपारी सुमारे १२.४० वाजता डायल ११२ वर विरवाडे येथील मरीआई मंदिराजवळ एका पुरुषाने गळफास घेतल्याची माहिती प्राप्त झाली. तक्रारीची गंभीरता लक्षात घेऊन दोन्ही पोलीस कर्मचारी शासकीय वाहनाने तातडीने घटनास्थळी रवाना झाले. मात्र, तेथे पोहोचून चौकशी केली असता अशा प्रकारची कोणतीही घटना घडलेली नसल्याचे स्पष्ट झाले. यानंतर संबंधित मोबाईलधारकाशी संपर्क साधून चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पुढील तपासात त्याने स्वतःचे नाव रामसिंग भावसिंग बारेला (वय २५), रा. विरवाडे, ता. चोपडा, जि. जळगाव असे सांगितले. गावातील पोलीस पाटील व युवकाच्या वडिलांकडे चौकशी केली असता, संबंधिताने मुद्दाम पोलिसांना त्रास देण्यासाठी खोटा कॉल केल्याचे समोर आले. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अतुल मोरे यांच्या फिर्यादीवरून रामसिंग भावसिंग बारेला याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता () कलम २१२ अन्वये चोपडा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. डायल ११२ ही नागरिकांच्या आपत्कालीन मदतीसाठी असलेली महत्त्वाची सेवा आहे. खोटे कॉल करून पोलिसांची दिशाभूल केल्यास प्रत्यक्ष गरजू नागरिकांपर्यंत मदत पोहोचण्यास विलंब होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी डायल ११२ चा वापर केवळ खरी व तातडीची गरज असल्यासच करावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# पटेल महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे, लोकमान्य टिळकांना अभिवादन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपूर** प्रतिनिधी

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर येथे विद्यार्थी विकास विभाग व समान संधी केंद्राच्या संयुक्त विद्यमाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिसभा सदस्य दिनेश चव्हाण उपस्थित होते. तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. एस. पी. उमरीवाड आणि डॉ. एम. के. सोनवणे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी केले. यानंतर महाविद्यालयीन ग्रंथालयात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यकृतींचे पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले. प्रदर्शनाची माहिती ग्रंथपाल डॉ. एस. एस. साळुंखे यांनी उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हेमंत बाविस्कर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. एम. के. सोनवणे यांनी केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. एस. एन. वैष्णव, डॉ. पी. आर. महाजन, प्रा. एस. आर. इंगळे, डॉ. जे. पी. नेहेते, डॉ. एस. बी. पाटील, डॉ. एस. ए. पाटील, डॉ. पी. आर. गवळी, डॉ. रामटेक, डॉ. एन. यू. बारी, प्रा. प्रदीप तायडे, प्रा. अक्षय महाजन, प्रा. एस. बी. महाजन यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हर्षल पाटील, श्रेयस पाटील आणि अनुराग पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पाचोरा-भडगाव अतिवृष्टीग्रस्तांना आर्थिक पॅकेज द्या!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा** प्रतिनिधी

पाचोरा व भडगाव तालुक्यात मागील काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती, घरे, दुकाने व पशुधनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या दोन्ही तालुक्यांना विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करून बाधित शेतकरी व नागरिकांना तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी भाजपा नेते अमोल शिंदे यांनी म हाराष्ट्राचे जलसंपदा तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. पाचोरा व भडगाव तालुक्यात



झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक नदी-नाले व ओढ्यांना पूर आला. त्यामुळे अनेक गावांतील शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून नदी व नाल्यालगतच्या वस्त्यांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांच्या घरांचे तसेच पशुधनाचेही मोठे नुकसान झाले आहे. याशिवाय भडगाव व पाचोरा शहरातून वाहणाऱ्या मोठ्या नाल्यांतील पाणी दुकाने व घरांमध्ये घुसल्यामुळे व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या संपूर्ण परिस्थितीमुळे बाधित कुटुंबे व शेतकरी मोठ्या संकटात सापडले असून शासनाने तातडीने पंचनामे पूर्ण करून नुकसानभरपाईचे वितरण करावे, अशी आग्रही मागणीही करण्यात आली आहे. अमोल शिंदे यांनी राज्य शासनाने पाचोरा व भडगाव तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्तांसाठी विशेष आर्थिक पॅकेज मंजूर करून शेतकरी, व्यापारी व नागरिकांना त्वरित आर्थिक मदत देण्याची मागणी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीष महाजन यांना निवेदना द्वारे केली आहे. याप्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष राधेश्याम चौधरी, व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# खडसेंबद्दलच्या अश्लील वक्तव्य विरोधात गुन्हा दाखल करण्याची भाजपची मागणी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सावदा** प्रतिनिधी

रावेर लोकसभा क्षेत्राच्या खासदार तथा केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्याविषयी मोबाईल संभाषणामध्ये अत्यंत अर्वाच्च व गलिच्छ भाषा वापरून बदनामी केल्याप्रकरणी विजय चौधरी या व्यक्तीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी सावदा शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात सावदा पोलीस ठाण्यात सहाय्यक



पोलीस निरीक्षकांना अधिकृत निवेदन सादर करण्यात आले आहे. दोन दिवसांपूर्वी एका मोबाईल संभाषणामध्ये विजय चौधरी या व्यक्तीने केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्याबद्दल बोलताना अत्यंत खालच्या पातळीची आणि असभ्य भाषा वापरली. महिला लोकप्रतिनिधीबद्दल असे हीन दर्जाचे वर्तन करणे अत्यंत निषेधार्ह असल्याचे निवेदनात म्हटले आहे. महिलांचा अपमान करणाऱ्या आणि सार्वजनिक पातळीवर बदनामी करणाऱ्या अशा असभ्य प्रवृत्तीच्या व्यक्तीवर तात्काळ भारतीय न्याय संहिता कलम ७४ नुसार विनयभंगाचा व योग्य त्या कलमान्वये गुन्हा दाखल करावा, अशी आक्रमक भूमिका भाजप पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे. या निवेदनावर सावदा शहर नगराध्यक्षा रेणूका पाटील, रंजना भारंबे, नगरसेवक पंकज येवले, सचिन बऱ्हाटे, नकुल बेंडाळे, जयश्री नेहेते, गजानन भार्गव आणि राजेंद्र चौधरी, देवयानी बेंडाळे यांच्यासह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. या प्रकरणी पोलीस प्रशासनाकडून काय पावले उचलली जातात, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागून आहे.

## राज्य मार्गदर्शक संत आघाडीपदी उदयगिरी महाराज

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**लोहारा ता. पाचोरा** प्रतिनिधी



शहापुरा (लोंढीपुरा) येथील हभप अमोल महाराज यांची श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेना एकीकृत राष्ट्रीय राजपूत युवा संघटन, भारत यांच्या महाराष्ट्र राज्य मार्गदर्शक संत आघाडीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचे पत्र महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रवीणसिंहजी पाटील (राजपूत) यांनी प्रदान केले. धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत संघटनेने त्यांची राज्य मार्गदर्शक संत आघाडीपदी नियुक्ती केली आहे. त्यांच्या नियुक्तीचे विविध सामाजिक, धार्मिक व वारकरी क्षेत्रातून स्वागत करण्यात येत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हभप अमोल महाराज यांनी वयाच्या अकराव्या वर्षापासून परमार्थाचा मार्ग स्वीकारला होता.

# हिंगोणे ग्रामपंचायतीच्या सहा वर्षांच्या कामांची चौकशी करा!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**यावल** प्रतिनिधी

यावल तालुक्यातील हिंगोणे ग्रामपंचायतीत सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीत झालेल्या विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते आकाश तायडे यांनी केला आहे. या प्रकरणाची जिल्हास्तरीय स्वतंत्र समितीमार्फत चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली असून, १५ दिवसांत कारवाई न झाल्यास मुंबई उच्च न्यायालयात धाव घेण्याचा इशाराही दिला आहे. आकाश तायडे यांनी गटविकास अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रारी आणि माहितीच्या अधिकारांतर्गत अर्ज करून ग्रामपंचायतीतील विकासकामांची माहिती मागविली होती. त्यानंतर पंचायत समिती, यावल यांनी प्राथमिक चौकशी केली. मात्र चौकशी पूर्ण होऊनही अंतिम अहवाल अद्याप जाहीर करण्यात आलेला नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. तायडे यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित विकासकामांच्या मोजमाप पुस्तिका बिले आणि काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यांवर तपासणी करणाऱ्या आणि मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यांच्याच स्वाक्षऱ्या असल्याने चौकशीच्या निष्पक्षतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे पंचायत समिती




स्तरावरील चौकशीऐवजी जिल्हास्तरीय स्वतंत्र समितीमार्फत तपास होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यासोबतच पंचायत समितीचा प्रलंबित चौकशी अहवाल तातडीने जाहीर करावा, सन २०२० ते २०२६ या कालावधीतील सर्व विकासकामांची स्वतंत्र चौकशी करावी तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित सर्व महत्त्वाचे दस्तऐवज जप्त करून सुरक्षित ठेवावेत, अशा मागण्याही त्यांनी केल्या आहेत. १५ दिवसांत या मागण्यांवर योग्य ती कारवाई न झाल्यास भारतीय संविधानाच्या कलम २२६ अंतर्गत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत चौकशीची मागणी करण्यात येईल, असा इशारा आकाश तायडे यांनी दिला आहे. ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता यावी आणि सार्वजनिक निधीचा योग्य वापर झाला आहे का, याची निष्पक्ष चौकशी व्हावी, या उद्देशाने हा पाठपुरावा सुरू असल्याचे तायडे यांनी सांगितले. दरम्यान, या आरोपांवर संबंधित ग्रामपंचायत किंवा प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## तरुणावर तलवार, चाकूने वार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**

**नागपूर** – नागपूरमध्ये रक्तरंजित थरार घडला. रात्री भररस्त्यात तरुणांवर जीवघेणा हल्ला करण्यात आला. नागपूर जिल्ह्यातील खापरखेडा पोलिस ठाण्यापासून काही अंतरावरील मुख्य बाजारपेठेत रविवारी रात्री ही घटना घडली. जुन्या वादातून भररस्त्यात तलवारी, फावडे आणि चाकूंनी तरुणावर सशस्त्र हल्ला करण्यात आला. त्याला वाचवण्यासाठी गेलेल्या त्याच्या दोन मित्रांवर देखील हल्ला करण्यात आला. या घटनेमध्ये तिघेही जखमी झाले आहेत. एकाची प्रकृती गंभीर आहे. या घटनेचा थरारक व्हिडीओ व्हायरल होत आहे. संध्याच्या किंचाळ्या आणि ओरडण्याचा आवज ऐकून शाळेतील कर्मचारी तिला वाचवण्याचा प्रयत्न करतात पण आरोपी त्यांच्या दिशेने चाकू घेऊन धावत जातो. त्यामुळे ते घाबरले.

## महत्वाचे

### दिवसा ढवळ्या अडीच लाखांची धाडसी चोरी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**

**चोपडा** – शहरातील यावल रोडवरील सुदर्शन कॉलनी परिसरात दिवसा ढवळ्या घरफोडीची घटना घडली असून अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून तब्बल २ लाख ५२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुदर्शन कॉलनीतील प्लॉट क्रमांक ३१ येथे राहणारे विजय रामकृष्ण महाजन हे मंगळवारी (दि. ४ ऑगस्ट) सकाळी ९.५० ते १०.४५ वाजेच्या दरम्यान पत्नीला क्लासला सोडण्यासाठी घराला कुलूप लावून गेले होते. त्याचवेळी अज्ञात चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील लाकडी कपाटाचे लॉकर फोडून दोन लाख रुपये रोख रक्कम, १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, लहान मुलांच्या कानातील सोन्याच्या बाळ्या तसेच सुमारे ४० भार वजनाचे चांदीचे दागिने असा एकूण २ लाख ५२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी विजय महाजन यांच्या फिर्यादीवरून चोपडा शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा क्रमांक ३२३/२०२६ नोंदविण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३०५(अ) व ३३१(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक पवन देसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चेतन परदेशी पुढील तपास करीत आहेत.

### विहिरीत आढळला अज्ञात वृद्धाचा मृतदेह

**लोकशाही न्यूज नेटवर्क**

**जळगाव** – शिरसोली ते पाचोरा रस्त्यावर शिरसोलीपासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर असलेल्या मिठाराम आनंदा पाटील यांच्या शेतातील विहिरीत आज सकाळी ८ वाजेच्या सुमारास एका अज्ञात ६० ते ६२ वर्षीय वृद्ध महिलेचा मृतदेह तरंगताना आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सदर प्रकार आत्महत्या आहे की खून, या दिशेने एमआयडीसी पोलिसांकडून सखोल तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी ८ वाजेच्या सुमारास शेतमालक मिठाराम पाटील नेहमीप्रमाणे शेतात आले असता, रोडलगत असलेल्या विहिरीमध्ये त्यांना एक वृद्ध महिला मृत अवस्थेत दिसून आली.

## स्व.बबन भाऊ बाहेती स्मृती जिल्हा कॅरम स्पर्धेत नईम अन्सारी विजेता



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

जळगाव जिल्हा कॅरम असोसिएशन तर्फे स्व. बबन भाऊ बाहेती यांच्या जयंती निमित्त दि. १ व २ ऑगस्ट दरम्यान कांताई सभागृह येथे आयोजित जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेच्या अंतिम सामन्यात जैन स्पोर्ट्स अकॅडमीच्या नईम अन्सारीने भुसावळच्या कॅरम क्लबचे दानिश शेखचा १८-१६ आणि २५-१२ असा पराभव करून विजेतेपद पटकाविले. त्याला रोख रुपये ४०००/- आणि चषक पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. दानिश शेख याला रोख रुपये ३०००/- व चषक प्राप्त झाले. तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर आलेल्या अय्युब खान व रईस शेख यांना प्रत्येकी १५००/- रुपये व चषकाने गौरविण्यात आले. तत्पूर्वी उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात नईम अन्सारीने अय्युब खान (तमन्ना कॅरम) याचा २५-०४ व २५-०६ असा पराभव केला आणि दुसऱ्या उपांत्य सामन्यात दानिश शेख याने रईस शेख (तमन्ना कॅरम) याचा १९-०८ आणि १९-१७ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. स्पर्धेत ५ ते ८ क्रमांकाचे पारितोषिक अनुक्रमे फिरोज खान, सैय्यद मोहसिन, वसीम खान व रोशन खान यांनी प्रत्येकी रोख रुपये १०००/- चे बक्षिस प्राप्त केले. स्पर्धेतील सर्व पारितोषिके रोहन बाहेती यांच्यातर्फे देण्यात आली. सागर सोपारकर यांच्या तर्फे कॅरम स्ट्राईकर्स उत्तेजनार्थ म्हणून तीन खेळाडूंना देण्यात आलीत. प्रमूख पंच म्हणून चंद्रशेखर नर्वरिया, बोर्ड पंच म्हणून सैय्यद युसुफ, वसीम मलिक, शेख अजीज, रईस शाह, वसीम खान, सज्जाद खान, जैद शेख, साकिब अन्सारी, अजहर शेख, अस्लम खान, सैय्यद जुबेर, शेख नाझीम यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी कॅरम असोसिएशन चे अध्यक्ष राधेश्याम कोगटा, सचिव नितिन बरडे, उपाध्यक्ष रंगनाथ पाटील, राज्य संघटनेचे उपाध्यक्ष मंजूर खान, जैन स्पोर्ट्स अकॅडमीचे अरविंद देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सैय्यद मोहसिन, योगेश धोंगडे, फिरोज खान, नासीर खान, अताऊल्लाह खान, शेख अजीज, मुस्तफा बागवान आदींनी सहकार्य केले.

## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त वृक्षारोपण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**शिंदाड ता. पाचोरा** प्रतिनिधी



तालुक्यातील वाणेगाव येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. सामाजिक ऐक्य, पर्यावरण संवर्धन आणि महापुरुषांच्या विचारांचे जतन करण्याचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमात ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यावेळी त्यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि वंचित समाजाच्या उन्नतीसाठी दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी पिंपळगाव (हरेश्वर) पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्याणी वर्मा व सरपंच अतुल पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी ज्योती पाटील, सुनील कोतकर, दिलीप चव्हाण, अर्जुन चव्हाण, विशाल चव्हाण, समाधान चव्हाण, हेमराज चव्हाण, नमन चव्हाण, अरुण चव्हाण, ज्ञानेश्वर चव्हाण, ज्ञानेश्वर चव्हाण तसेच इतर अशोक चव्हाण, प्रकाश चव्हाण, दिनेश चव्हाण, विनोद चव्हाण, वाल्मीक चव्हाण, भारत चव्हाण, शिवाजी चव्हाण, संजय चव्हाण, कौतिक चव्हाण, मधुकर चव्हाण, वाणेगावचे पोलिस पाटील, डॉ. नितीन जमदाडे, मोतिलाल गायकवाड, शैलेश चव्हाण, शुभम चव्हाण, मनोज चव्हाण, भूषण चव्हाण, सागर चव्हाण, गोपाल चव्हाण, अजय मान्यवर उपस्थित होते.

## रोटरी क्लब जळगावतर्फे राखी प्रशिक्षण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी




येथील रोटरी क्लब जळगाव यांच्यावतीने नंदिनीबाई वामनराव मुलींचे विद्यालयातील विद्यार्थिनींना राखी बनविण्याचे मोफत प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमात ५० विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थिनींना आकर्षक, पर्यावरण पूरक व हस्तनिर्मित राखी तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण साहित्य देऊन करण्यात आल्याची माहिती रोटरी क्लबच्या मानद सचिव स्वाती ढाके यांनी दिली. कार्यशाळेमुळे विद्यार्थिनींमध्ये सर्जनशीलता, हस्तकला कौशल्य, आत्मविश्वास आणि स्वावलंबनाची भावना विकसित होण्यास प्रेरणा मिळाल्याचे प्रशिक्षक व रोटरी क्लबच्या डॉ. काजल फिरके यांनी सांगितले. कार्यशाळेस मुख्याध्यापिकांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट बेस्ट मार्चिंग स्पर्धेत वांद्रेकर आश्रम शाळा प्रथम



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाल ता. रावेर** प्रतिनिधी

१८ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, जळगाव व जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने एम. जे. कॉलेज मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट बेस्ट मार्चिंग (ड्रिल) स्पर्धेत द. न. वांद्रेकर माध्यमिक आश्रम शाळा, पाल येथील एनसीसी ग्रुपने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेसह पाल परिसरात आनंदाचे वातावरण आहे. दरवर्षीप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत सीनियर डिव्हिजन व ज्युनिअर डिव्हिजन अशा दोन गटांमध्ये स्पर्धा झाली. ज्युनिअर डिव्हिजनमध्ये १८ महाराष्ट्र बटालियन अंतर्गत विविध एनसीसी ग्रुप सहभागी झाले होते. यामध्ये द. न. वांद्रेकर माध्यमिक आश्रम शाळेच्या एनसीसी पथकाने उत्कृष्ट मार्चिंग व ड्रिलचे कौशल्य सादर करत विजेतेपदाची ढाल पटकावली. विजेत्या संघात २४ एनसीसी जेडी व जेडब्ल्यू कॅडेट्सचा सहभाग होता. स्पर्धेतील विजेत्या संघाला जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे (आयएएस) यांच्या हस्ते विजेतेपदाची ढाल प्रदान करण्यात आली. १८ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल धिरज मिलोत्रा यांनीही विजेत्या कॅडेट्सचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल संस्था प्रमुख शिरीष चौधरी, अध्यक्ष झांबरे, सचिव अजित पाटील यांनी विद्यार्थी, एनसीसी अधिकारी व शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक बी. जी. पारधी, एनसीसी अधिकारी नरेंद्र साठे, सर्व सहकारी शिक्षक तसेच माजी एनसीसी कॅडेट्स गणेश चव्हाण, गिरीश चव्हाण आणि नर्गिस तडवी यांचे मार्गदर्शन लाभले.

## आदिवासी समाज मतदारांसाठी सखोल पुनरीक्षण मोहीम

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**एरंडोल** प्रतिनिधी




येथील मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मतदारांना एसआयआर संदर्भात आणि एस आय आर विषयी जनजागृती व एस आय आर चे महत्व तसेच लागणारी कागदपत्रे इत्यादींविषयी माहिती देण्यात आले संबंधित मतदान केंद्रांवर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम करून मतदार नोंदणी, नावांमध्ये दुरुस्ती, स्थलांतरित मतदारांची नोंद, तसेच नवमतदारांची नोंदणी ही कामे यशस्वीरीत्या पूर्ण केली. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रांताधिकारी मनीष कुमार गायकवाड, तहसीलदार गोपाल पाटील, नगरपालिकेचे मुख्याधिकारी बागुल, निवडणूक शाखेचे नायब तहसीलदार किशोर माळी, नगरपालिकेचे कार्यालय अधीक्षक एस आर ठाकूर निवडणूक शाखेचे अधिकारी, बीएलओ तसेच सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या समन्वयातून मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. प्रशासनाने या मोहिमेत सहकार्य करणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचारी व नागरिकांचे आभार मानले असून मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत करण्यासाठी सर्वांनी असेच सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

## साकळी आरोग्य केंद्रात स्तनपान सप्ताह

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मनवेल ता. यावल** प्रतिनिधी



येथून जवळ असलेल्या साकळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सोमवार (दि. ३ ऑगस्ट) रोजी जागतिक स्तनपान सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी वैद्यकीय अधिकारी डॉ. मुकेश चौधरी यांच्या हस्ते आशा सेविका व गट प्रवर्तक यांनी स्तनपान सप्ताह या विषयावर काढलेल्या आकर्षक रांगोळीचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. मुकेश चौधरी तसेच अधिपरिचारिका वृषाली पाटील यांनी स्तनपानाची योग्य पद्धत, स्तनपान करताना येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय, तसेच आईच्या दुधाचे माता व बाळासाठी होणारे आरोग्यदायी फायदे याविषयी उपस्थित गरोदर माता व स्तनदा मातांना सविस्तर मार्गदर्शन केले. यानंतर उपस्थित गरोदर माता व स्तनदा मातांना पोषण आहाराचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास राजू तडवी, गट प्रवर्तक चित्रा जावळे, लीना पाटील तसेच आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या.

## शिवरायांच्या अश्वारुढ पुतळ्यास मंजुरी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**यावल** प्रतिनिधी

यावल नगरपालिकेची सर्वसाधारण सभा मंगळवारी नगराध्यक्षा छाया अतुल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेत शहराच्या विकासाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा झाली. यावेळी नगरपालिकेच्या आर्थिक स्थितीला बळकटी देण्यासाठी चतुःवार्षिक मालमत्ता कर आकारणी तातडीने राबविण्याची मागणी करण्यात आली, तर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याच्या प्रस्तावालाही एकमताने मंजुरी देण्यात आली. सभेच्या सुरुवातीलाच माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक अतुल पाटील यांनी नगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुद्दा उपस्थित केला. सन २०२२-२३ पासून होणे अपेक्षित असलेली चतुः वार्षिक मालमत्ता कर आकारणी अद्याप झालेली नसल्याने नगरपालिकेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता आणि इतर विकासकामांसाठी निधीची कमतरता भासत असून ही आकारणी तातडीने नव्याने राबविण्याची मागणी त्यांनी केली. त्यांच्या मागणीला सभागृहातील सदस्यांनी पाठिंबा दिला. शहराच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अस्मितेशी संबंधित असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या उभारणीच्या प्रस्तावालाही सभेत एकमताने मंजुरी देण्यात आली. या निर्णयाचे शहरातील शिवप्रेमी आणि नागरिकांनी स्वागत केले आहे. यावेळी नगराध्यक्षा छाया पाटील म्हणाल्या की, शहराच्या विकासाबरोबरच ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जपणे ही नगरपालिकेची जबाबदारी आहे. दरम्यान सभेला सुरुवात होण्यापूर्वी मुख्याधिकारी नियोजित वेळेत उपस्थित नसल्याबद्दल अतुल पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. सभेला उपनगराध्यक्षा सईदा बी. मोहम्मद याकूब, मुख्याधिकारी गवई, नगरसेवक पराग सराफ, सागर चौधरी, नंदा महाजन, राकेश कोलते, निसार शेख, वैशाली बारी, कल्पना वाणी, कमरुन्निसाबी सैफुद्दीन, इमाम रजा, शालू भालेराव, शीला सोनवणे यांच्यासह सर्वपक्षीय नगरसेवक उपस्थित होते.

## वनश्री जनाबापू मेहेत्रे वृक्षतोडीविरोधात आक्रमक

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**देऊळगाव राजा** प्रतिनिधी



देऊळगाव राजा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या वृक्षतोडीविरोधात निसर्गप्रेमी व महाराष्ट्र शासनाचा २०१२ चा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार प्राप्त जनाबापू (द्वारका नामदेव) मेहेत्रे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी तहसीलदार देऊळगाव राजा यांच्यापासून भारताचे राष्ट्रपती यांच्यापर्यंत निवेदन पाठवून संपूर्ण प्रकरणाची मुद्देनिहाय चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, गेल्या काही महिन्यांपासून देऊळगाव राजा तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यांच्या दुतर्फा असलेल्या वृक्षांची मोठ्या प्रमाणावर तोड करण्यात येत आहे. महावितरणच्या कामांच्या नावाखाली आवश्यक परवानग्यांशिवाय वृक्षतोड होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच वन विभाग, महसूल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित ठेकेदार यांच्या संगनमतातून ही वृक्षतोड होत असल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे. सिनगाव जहागीर परिसरातील खल्याळगव्हाण ते शिनगाव फाटा या मार्गावरील महाकाय वृक्षांची कत्तल झाल्यामुळे परिसरातील नैसर्गिक समतोल बिघडला असून पर्यावरणासह नागरिकांच्या आरोग्यावरही त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकाराकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. जनाबापू मेहेत्रे यांनी आपल्या निवेदनात एकूण १८ मुद्दे मांडत संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. सदर प्रकरणाची निष्पक्ष चौकशी झाली नाही, तर लोकशाही मार्गाने आणि शांततेच्या माध्यमातून साखळी उपोषण करण्याचा इशाराही जनाबापू मेहेत्रे यांनी आपल्या निवेदनातून दिला आहे.

## स्वयंसहाय्यता बचतगटांना ट्रॅक्टरसाठी ९० टक्के अनुदान

जळगाव लोकशाही न्यूज नेटवर्क

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या विद्यमाने तसेच सहायक आयुक्त, समाज कल्याण, जळगाव यांच्या मार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व त्यांच्या उपसाधनांचा पुरवठा करण्याची योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी बचतगटातील किमान ८० टक्के सदस्य अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील असणे आवश्यक आहे. तसेच बचतगटाचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असावे आणि गट विकास अधिकारी, कृषी अधिकारी किंवा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडे बचतगटाची नोंदणी असणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत मिनी ट्रॅक्टर व त्यांची उपसाधने खरेदी केल्यानंतर संबंधित बचतगटाच्या बँक खात्यात ३ लाख १५ हजार रुपये जमा करण्यात येतात. मिनी ट्रॅक्टर व त्याच्या उपसाधनांच्या खरेदीची कमाल मर्यादा ३ लाख ५० हजार रुपये इतकी आहे. नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचतगटांनी कमाल मर्यादा रकमेपैकी १० टक्के हिस्सा स्वतः भरल्यानंतरच ते ९० टक्के अनुदानासाठी पात्र राहतील. योजनेबाबत अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, जळगाव, दुरध्वनी क्रमांक ०२५७२२६३३२९ येथे संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त योगेश पाटील यांनी केले आहे.

## महत्वाचे

### कारमधून १२.५० लाखांची रोकड लंपास

लोकशाही न्यूज नेटवर्क

**जळगाव :** शहरातील गणपती नगर परिसरात एका फळ घाऊक व्यापाऱ्याची १२ लाख ५० हजार रुपयांची रोकड अज्ञात चोरट्यांनी चलाखीने लंपास केल्याची घटना ३ ऑगस्ट रोजी रात्री घडली. तेलगळती होत असल्याचा बहाणा करून व्यापाऱ्याला कारमधून खाली उतरविण्यात आले आणि संधी साधून कारच्या मागील सीटवर ठेवलेली रोकड असलेली बॅग चोरट्यांनी पळविली. या प्रकरणी चार अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिल ओमप्रकाश मंधान (वय ४४, रा. गणपती नगर, जळगाव) हे कृषी उत्पन्न बाजार समिती, एमआयडीसी येथील अमर फ्रूट या घाऊक फळ व्यवसायाचे संचालक आहेत. दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी विविध व्यापाऱ्यांकडून त्यांना एकूण १३ लाख रुपयांची रोकड मिळाली होती. त्यापैकी ५० हजार रुपये वेगळे काढून उर्वरित १२ लाख ५० हजार रुपये त्यांनी काळ्या रंगाच्या बॅगेत ठेवले. सायंकाळी दुकान बंद करून ते (एमएच ४६ बीव्ही ३२९५) या कारने घरी निघाले. रात्री सुमारे ८.०५ वाजता घराजवळ कार पार्क करत असताना एका अज्ञात व्यक्तीने त्यांच्या कारमधून ऑईल गळत असून धूर निघत असल्याचे सांगितले. त्यावर विश्वास ठेवून ते कारमधून खाली उतरले. याच संधीचा फायदा घेत पांढरा शर्ट व काळी जिन्स परिधान केलेल्या एका अज्ञात इसमाने कारचा मागील दरवाजा उघडून रोकड असलेली बॅग उचलली आणि धूम ठोकली.

### निवृत्तीवेतनधारकांनी केवायसी करून घ्यावी!

**जळगाव :** जिल्हा कोषागार कार्यालयातून दरमहा निवृत्तीवेतन घेणारे राज्य शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारक, शिक्षक व शिक्षकेतर निवृत्तीवेतनधारक तसेच इतर राज्यातून सेवानिवृत्त होऊन जळगाव जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत निवृत्तीवेतन घेणाऱ्या सर्वांनी आपल्या बँक खात्याचे केवायसी तात्काळ पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा कोषागार कार्यालयाने केले आहे. बँकेच्या नियमानुसार प्रत्येक खातेधारकाने ठराविक कालावधीनंतर केवायसी करणे आवश्यक असते. त्यामुळे बँक खाते अबाधित राहून सर्व बँक व्यवहार सुरळीत व सुरक्षितपणे सुरू राहतात. मागील काही महिन्यांपासून काही निवृत्तीवेतनधारकांचे बँक खाते बंद असणे किंवा केवायसी न केल्यामुळे त्यांचे निवृत्तीवेतन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून परत येत असल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी संबंधित वयोवृद्ध निवृत्तीवेतनधारकांना वेळेवर निवृत्तीवेतन मिळत नसल्याने त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

# तात्काळ पंचनामे करून मदत उपलब्ध करा!

## अमळनेरामधील अतिवृष्टीग्रस्त भागांची मंत्र्यांकडून पाहणी

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

अमळनेर शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक भागांमध्ये घरे, रस्ते तसेच सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील व राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी अमळनेर शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे नुकसानग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांशी



संवाद साधला. यावेळी त्यांनी जिल्हा व स्थानिक प्रशासनाला तातडीने मदतकार्य पूर्ण करण्याच्या तसेच सर्व नुकसानीचे पंचनामे त्वरित करण्याच्या सूचना दिल्या.

या पाहणी दरम्यान घरांमध्ये पाणी शिरल्याने नुकसान झालेल्या कुटुंबीयांना शासनाकडून नियमानुसार आर्थिक मदत तात्काळ देण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. तसेच शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होऊ नये यासाठी पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या मुख्य जलवाहिनीच्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीतून तात्काळ निधी उपलब्ध करून देण्यात यावा, असे मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले. पालकमंत्री व जलसंपदा मंत्री यांनी विविध नुकसानग्रस्त वस्त्यांमध्ये जाऊन नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. विविध प्रकारचे नुकसान झालेल्या कुटुंबियांनी घरे, संसारोपयोगी साहित्य, अन्नधान्य तसेच अन्य मालमत्तेचे झालेल्या नुकसानीबाबत समस्या पालकमंत्री व जलसंपदा मंत्री यांच्यासमोर मांडल्या, त्यावर प्रशासनाने कोणताही विलंब न लावता मदत व पुनर्वसनाची प्रक्रिया राबवावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

यावेळी प्रशासनाला शेती, घरे, रस्ते, सार्वजनिक सुविधा व अन्य मालमत्तेच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून अहवाल शासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. बाधित नागरिकांना आवश्यक ती सर्व मदत वेळेत मिळेल, अशी ग्वाहीही मंत्री श्री. महाजन यांनी दिली. या पाहणीवेळी जिल्हाधिकारी रोहन घुगे, आमदार अनिल पाटील, माजी आमदार शिरीष चौधरी, नगराध्यक्ष परीक्षित बाविस्कर, उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, नगरपालिका मुख्याधिकारी गणेश शिंदे, अशोक पाटील यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### पूरग्रस्तांना आर्थिक मदत

पूरग्रस्त नागरिकांना तातडीची आर्थिक मदत व शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी निधी आणि पंचनाम्यांचे आदेश यामुळे मदतकार्याला अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, प्रशासनाने युद्धपातळीवर काम सुरू केले आहे.

### शिरसोली परिसर हादरला : आत्महत्या की घातपात?

## विहिरीत आढळला अज्ञात वृद्धाचा मृतदेह

लोकशाही न्यूज नेटवर्क
एरंडोल प्रतिनिधी

तालुक्यातील शिरसोली ते पाचोरा रस्त्यावर शिरसोलीपासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर असलेल्या मिठाराम आनंदा पाटील यांच्या शेतातील विहिरीत मंगळवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास एका अज्ञात ६० ते ६२ वर्षीय वृद्ध महिलेचा मृतदेह तरंगताना आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सदर प्रकार आत्महत्या आहे की खून, या दिशेने एमआयडीसी पोलिसांकडून सखोल तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास शेतमालक मिठाराम पाटील नेहमीप्रमाणे शेतात आले



असता, रोडलगत असलेल्या विहिरीमध्ये त्यांना एक वृद्ध महिला मृत अवस्थेत दिसून आली. त्यांनी तातडीने या घटनेची माहिती शिरसोलीचे पोलीस पाटील श्रीकृष्ण बारी यांना दिली. पोलीस पाटलांनी लागलीच घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली आणि एमआयडीसी पोलिसांना पाचारण केले. घटनेची बातमी वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळी शिरसोली गावातील ग्रामस्थांची मोठी गर्दी जमली होती. मात्र, मृत महिलेची ओळख पटू शकलेली नाही. पोलिसांकडून मृतदेह विहिरीतून बाहेर काढून शवविच्छेदनसाठी जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (जीएमसी) हलवण्यात आला आहे. दरम्यान, ही आत्महत्या आहे की घातपात, याचे उत्तर पोलीस तपास आणि शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. या अज्ञात वृद्ध महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## मिशन ग्रीन सिटी अंतर्गत १ लाख वृक्षारोपणाचा धडाका!

### महानगरपालिकेचा अभिनव उपक्रम : सोमवारी होणार शुभारंभ

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हरित महाराष्ट्र मिशन अंतर्गत जळगाव शहर महानगरपालिका प्रशासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मिशन ग्रीन जळगाव सिटी या विशेष मोहिमेअंतर्गत शहरात तब्बल १ लाख वृक्षारोपण करण्याचे भव्य नियोजन करण्यात आले आहे. सोमवार दि. १० रोजी राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील, खासदार स्मिता वाघ, आमदार राजूमामा भोळे यांच्या उपस्थितीत मोहिमेला सुरुवात होणार आहे.

जळगाव शहराला हिरवाईची शाल पांघरण्यासाठी व जळगावला प्रदूषणमुक्त आणि नयनरम्य बनवण्यासाठी ही मोहीम एक लोकचळवळ ठरणार आहे. शहरातील मुख्य रस्ते, गल्लीबोळ आणि महामार्गाच्या दोन्ही दुतर्फा (डिव्हायडर व बाजूला) मोठ्या प्रमाणावर सावली देणाऱ्या झाडांची लागवड केली जाईल. महापालिकेच्या मालकीच्या सर्व मोकळ्या जागा आणि सार्वजनिक भूखंडांवर हिरवाई फुलवली जाणार आहे. शहरातील प्रसिद्ध हेमू कलानी उद्यानात जपानी तंत्रज्ञानावर आधारित मियावाकी पद्धतीने अवघ्या काही काळात घनदाट जंगल उभारले जाईल. येथे तब्बल १५ हजारर रोपांची विशेष लागवड केली जाणार आहे. झाडे लावून ती जगवणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. यासाठी महापालिका प्रशासनाने झाडांच्या नियमित पाण्यासह, ट्री-गार्ड (संरक्षक जाळ्या) आणि देखभालीची सक्षम यंत्रणा उभारली आहे. स्थानिक नागरिकांनीही आपापल्या भागातील झाडांचे पालकत्व घ्यावे, असे आवाहन महापौर दीपमाला काळे, आयुक्त आदित्य जीवने यांनी केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हरित महाराष्ट्र मिशन अंतर्गत महापौर दीपमाला काळे यांच्या संकल्पनेतून महानगरपालिका, सामाजिक संस्था व नागरिकांच्या सहयोगाने साकारलेल्या या हरित मोहिमेत केवळ प्रशासनच नाही, तर शहरातील विविध स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, पर्यावरणप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येणार आहेत.



" जळगावचे तापमान आणि वाढते प्रदूषण लक्षात घेता, शहराला ग्रीन कॉरिडॉर बनवणे ही काळाची गरज आहे. या १ लाख वृक्षारोपणाच्या मोहिमेत प्रत्येक जळगावकराने किमान एक झाड लावून ते जगवण्याचा संकल्प करावा.चला, आपण सर्वजण मिळून या मिशन ग्रीन जळगावमध्ये सहभागी होऊया आणि आपल्या जळगावला अधिक सुंदर, हिरवेगार नि समृद्ध बनवू या!

**– दीपमाला काळे, महापौर, जळगाव**

## नातेसंबंधाच्या संशयातून व्यापाऱ्यावर हल्ला

लोकशाही न्यूज नेटवर्क
चाळीसगाव प्रतिनिधी

शहरातील धुळे रोड परिसरात नातेसंबंधाच्या संशयातून एका व्यापाऱ्यावर प्लास्टिकच्या जाड पाइपने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली. याप्रकरणी चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे १० वाजेच्या सुमारास धुळे



रोडवरील तेजस कॉर्नर परिसरात घडली.

फिर्यादी मंगेश सुभाष पाटे (वय ३८, रा. श्रीराम नगर, चाळीसगाव) हे आरोपींच्या नातेवाईकांशी बोलत असल्याचा राग मनात धरून आरोपी सागर अभिमन झोडगे (रा. धुळे रोड, चाळीसगाव) व त्याचा साथीदार शुभम (पूर्ण नाव व पत्ता अज्ञात) यांनी फिर्यादीला शिवीगाळ केली. यानंतर आरोपींनी प्लास्टिकच्या जाड पाइपने फिर्यादीच्या डाव्या हातावर, पाठीवर आणि डोक्यावर मारहाण करून दुखापत केली.

तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३६८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रशांत पाटील करीत आहेत.

## एरंडोलमध्ये भरधाव ट्रकची कारला धडक

लोकशाही न्यूज नेटवर्क
एरंडोल प्रतिनिधी

धुळे-जळगाव महामार्गावरील जत्रा हॉटेलसमोर भरधाव ट्रकने कारला धडक दिल्याची घटना रविवारी मध्यरात्री घडली. या अपघातात कारचे नुकसान झाले असून ट्रकचालकाच्या निष्काळजी वाहनचालनामुळे अपघात घडल्याप्रकरणी एरंडोल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एरंडोल पोलीस ठाण्यात सीसीटीएनएस गुन्हा क्रमांक १४५/२०२६ दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम २८१, ३२४(४) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी दीपक भास्करराव अहिरराव (वय ३७, रा. फापोरे, ता. अमळनेर, जि. जळगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार दि. २ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे १२.३० वाजेच्या सुमारास ते आपल्या वाहनातून धुळेकडून जळगावकडे जात होते. एरंडोल शहरातील जत्रा हॉटेलसमोर स्पीड ब्रेकर असल्याने त्यांनी आपल्या वाहनाचा वेग कमी केला. त्याचवेळी मागून भरधाव वेगाने आलेल्या आरजे-११/जीडी-१४२६ क्रमांकाच्या ट्रकने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या धडकेत वाहनाचे नुकसान झाले. या प्रकरणी संबंधित ट्रकचालकाविरुद्ध निष्काळजी व बेदरकारपणे वाहन चालवून अपघात घडविल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार योगेश महाजन करीत आहेत.

## एमआयडीसीतील बाबा नमकीन कंपनीला आग

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

शहरातील एमआयडीसी परिसरातील बाबा नमकीन चिवडा या कंपनीत मंगळवारी सकाळी अचानक भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. कंपनीतून धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाळा उसळत असल्याचे लक्षात येताच तातडीने महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला माहिती देण्यात आली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले आणि आग विझविण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू करण्यात आले.

सुरुवातीला दोन ते तीन



अग्निशमन बंबांच्या मदतीने आग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र आगीची तीव्रता लक्षात घेता आणखी अग्निशमन बंब पाचारण करण्यात आले. एकूण सहा ते सात अग्निशमन बंबांच्या मदतीने जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत अखेर आग पूर्णपणे आटोक्यात आणली. वेळेत आग नियंत्रणात आल्यामुळे मोठी दुर्घटना टळली. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असून या घटनेत कंपनीचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. आग लागण्याचे नेमके कारण आणि नुकसानीचा अचूक आकडा याबाबत संबंधित यंत्रणेकडून तपास सुरू आहे.

या बचावकार्यात वाहनचालक युसूफ पटेल, मयूर ओतारी, शोएब तडवी तसेच फायरमन योगेश कोल्हे, राकेश सोनवणे, इक्बाल तडवी, राकेश पाटील, विक्की सोनवणे आणि सतार तडवी यांनी मोलाचे योगदान दिले.

# खडसेंवरील कथित वक्तव्याविरोधात संतापमोर्चा

## गुर्जर समाज एकवटला : नंदुरबारमधील मोर्चात शेकडोंचा सहभाग

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव/नंदुरबार प्रतिनिधी

भाजपचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांच्यातील एका कथित ऑडिओ क्लिपवरून संपूर्ण महाराष्ट्रात राजकीय आणि सामाजिक वर्तुळात तीव्र संतापाची लाट पसरली आहे. या व्हायरल ऑडिओ क्लिपमध्ये केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे तसेच माजी खासदार डॉ. हिना गावित यांच्यासह इतर महिला लोकप्रतिनिधींविषयी अत्यंत आक्षेपार्ह आणि खालच्या पातळीवरील भाषा वापरल्याचा आरोप होत आहे. या घटनेच्या निषेधार्थ नंदुरबार जिल्ह्यात भव्य मोर्चा काढून प्रशासनाला निवेदन देण्यात आले.




नंदुरबार जिल्हा लेवा पाटीदार गुजर समाजाच्या वतीने या निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. भर पावसात काढण्यात आलेल्या या मोर्चात महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेश या तिन्ही राज्यांतील समाजबांधव आणि विशेषतः महिला वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. महिला लोकप्रतिनिधींविषयी अपशब्द वापरणाऱ्या विजय चौधरी यांना तातडीने अटक करण्यात यावी आणि त्यांना मदत करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई व्हावी, ही या मोर्चातील प्रमुख मागणी होती. दरम्यान, केंद्रीय मंत्री रक्षा खडसे या नंदुरबार जिल्ह्याच्या माहेरवाशीण असून जळगाव जिल्हा हे त्यांचे सासर आणि मुख्य कर्मभूमी आहे. अत्यंत संवेदनशील, मनमिळाऊ स्वभाव आणि राजकारण बाजूला ठेवून कामावर निष्ठा ठेवणारे लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख आहे. सर्वसामान्य नागरिक आणि महिला वर्गात त्या विशेष लोकप्रिय आहेत. अशा कर्तबगार लोकप्रतिनिधीबाबत आक्षेपार्य भाषा वापरल्याने महिला वर्गात प्रचंड रोष निर्माण झाला आहे.

नंदुरबार जिल्ह्यात ज्या आत्मियतेने आणि आक्रमकतेने महिलांच्या सन्मानासाठी सर्व समाज एकत्र आला, त्याच धर्तीवर आता रक्षा खडसे यांची कर्मभूमी असलेल्या जळगाव जिल्ह्यातही तसे आंदोलन उभे राहणार का, तसेच जळगावातील समाजबांधव आणि महिला वर्ग याविरोधात कधी एकत्र येणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.